दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –३४५ | सोमवार,दि.१८ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-345 | Monday, Dt.18 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी संपवण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने अनोखा उपक्रम

बीड / वैभव स्वामी

सातत्याने घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे बीड जिल्हा महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या,जगाच्या पटलावर बदनाम जिल्हा, गुन्हेगारीचा जिल्हा म्हणून ओळखला जात आहे. जिल्ह्याची ही बदनामीकारक ओळख पुसण्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेनुसार बीड जिल्ह्याला बदलण्याचे काम प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या हिमतीने सुरू केले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्यातील क्राईम संपवण्यासाठी मुळावर घाव घालत नशा मुक्त बीडचे आवाहन केले. या आव्हानाला जिल्हाधिकाऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भर पावसात सहभाग नोंदवून बदनाम होत असलेल्या बीड जिल्ह्याला सकारात्मक चेहरा देण्याचा प्रयत्न केला आहे.यावर नशा मुक्त बीड जनजागृती अभियानाने चार चांद लावले आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

बीड जिल्हा मागील काही वर्षापासून घडणाऱ्या विविध घटनेमुळे बदनाम जिल्हा म्हणून ओळखला जात आहे. बीड जिल्ह्याची ओळख मिनी बिहार म्हणून केली जात आहे.ही बाब बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत घातक आहे. मसाजोग प्रकरणानंतर बीड जिल्ह्याच्या बदनामी मध्ये मोठ्या प्रमाणात विकृती आली. बीड जिल्ह्यात जातीयवाद वाढला. बीड जिल्हा महाराष्ट्रमध्ये बदनाम झाला. बदनाम झालेल्या या बीड जिल्ह्याची ओळख बदलण्याची जबाबदारी किंबहुना शिवधनुष्य महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी उचलले. त्यांनी बीड जिल्ह्याला नॉन करप्ट अधिकारी देण्याचा प्रयत्न केला. या अधिकाऱ्यांनी देखील मागील काही महिन्यापासून बीड जिल्ह्यातील क्राईम कमी करत बीड जिल्ह्याला विकासाच्या झोतात आणत बीड जिल्ह्यामध्ये पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम बीड जिल्हा हे ब्रीद पेरण्याचे काम सुरू केले आहे. या कर्तुत्वाला, या कार्याला बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यामुळे खऱ्या अर्थाने चार चांद लागत आहेत. त्यांनी बीड जिल्ह्यातील होणारी क्राईम संपुष्टात आणण्यासाठी नशा मुक्त बीड जनजागृती अभियान ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणली. या अभियानामध्ये जिल्हा प्रशासनासह लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, सर्वसामान्य नागरिक यांना सहभागी करून घेत बीड जिल्ह्याला नवी ओळख निर्माण करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.नशा मुक्त बीड जनजागृती अभियानामध्ये भर पावसात बीडकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्याची नवी ओळख निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

## नशा मुक्त बीड जनजागृती मॅरेथॉन मध्ये जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्यासह बीडकर थिरकले !

### अधिकारी बेफान होऊन उत्साहात थिरकले


बीड जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने आयोजित नशामुक्त बीड जनजागृती अभियानामध्ये ५ किलोमीटर आणि १० किलोमीटर या स्पर्धेत अधिकारी कर्मचारी नागरिक यांनी भर पावसात उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या स्पर्धेच्या समारोपप्रसंगी छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मैदानावर बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह या अभियानाचे आयोजक पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि संपूर्ण प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार विविध क्षेत्रातील मान्यवर आणि प्रतिष्ठित नागरिकांनी नृत्याचा ठेका घेत आनंदोत्सवाची परिसीमा पार केली.

### बदनाम बीड जिल्हा लवकरच बदलणार..!

क्राईमच्या घटनांमुळे बदनाम झालेला बीड जिल्हा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या रोखठोक भूमिकेमुळे आणि पोलीस अधिकाऱ्यांनी आणि जिल्हा प्रशासनांनी सुरू केलेल्या सकारात्मक भूमिकळमुळे नक्कीच बदलणार आहे. बीड जिल्ह्याची नवी ओळख विकासाच्या उंबरठ्यावरील बीड जिल्हा म्हणून झाल्याशिवाय राहणार नाही हे नक्की.

### महत्वपूर्ण अभियानात माहिती विभाग झोपेत..?

बदनाम बीड जिल्ह्याला बदलण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहे. याच अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पोलीस विभागाच्या वतीने नशा मुक्त बीड जनजागृती अभियान १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते.या अभियानाची व्यापक प्रसिद्धी खऱ्या अर्थाने जिल्हा माहिती कार्यालय बीड यांच्या वतीने प्रसारित होणे अपेक्षित होते. मात्र एवढा मोठा इव्हेंट संपन्न होऊन सुद्धा बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने या अभियानाला कसल्याही प्रकारे प्रसिद्धी देण्यात आली नाही. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एकीकडे बदनाम बीड जिल्ह्याला सकारात्मक चेहरा देण्याचा प्रयत्न बीड जिल्हा प्रशासन करत असताना या प्रयत्नांना व्यापक प्रसिद्धी देण्यापासून बीडचे जिल्हा माहिती कार्यालय चार पावले मागे का ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे. यावर जिल्हाधिकारी आणि पालकमंत्री काय भूमिका घेतात याकडे आता लक्ष वेधले आहे.









### अभियानामध्ये पत्रकार संघाचा उत्स्फूर्त सहभाग...

पोलीस प्रशासनाच्या वतीने नशा मुक्त बीड जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह बीड जिल्ह्यातील तमाम पत्रकारांनी या अभियानामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पोलीस प्रशासनाच्या या स्तुत्य उपक्रमाला सहभागी होत समर्थन दिले.

### पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांचा व्यापारी महासंघाच्या वतीने गौरव

पोलिस दलाकडून व्यसनमुक्तीसाठी पुढाकार घेतला जात आहे. याकरिता कायदेशीर कारवाईबरोबरच जनजागृती देखील केली जात असून याबद्दल पोलिस अधिक्षक नवनित कॉवत यांचा जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी गौरव केला. यावेळी लईक अहमद तसेच योगा दीपमाळ ग्रुपचे जीतेंद्र बोरा यांची उपस्थिती होती.

परिशिष्ट – १०

**(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी–जाहीर सुचनेचा नमुना इंग्रजी)**

AMBAD MUNICIPAL COUNCIL

**GENERAL ELECTION YEAR 2025**

**PUBLIC NOTICE**

For the General Election of Ambad Municipal Council to be held in the year 2025 the programme for the publication of draft ward boundries is as follow:

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of publishing Notification of draft Ward Boundries | Monday, Date 18/08/2025 |
| 2 | Period for submitting objections and suggestion (To be Submitted to the Chief Officer for Objection and suggeshtion, in Election Office) | Monday Date 18/08/2025 to Sunday Date 31/08/2025 (Upto 3.00 p.m.) |

Note : The citizen who have filed Objections and suggestions will be informed separately about the date of hearing.

Place : MC Ambad
Date : 18/08/2025

**Signature**
**(Manoj Ukirde)**
Chief Officer,
Municipal Council Ambad

परिशिष्ट – १०

**(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी–जाहीर सुचनेचा नमुना मराठी)**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक अंबड

## जाहीर सूचना

अंबड नगर परिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार दिनांक १८/०८/२०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, नगर परिषद, अंबड यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार दिनांक ३१/०८/२०२५ (दुपारी ३.०० वा.पर्यंत) |

टिप : हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**ठिकाण : नगर परिषद, अंबड**
**दिनांक : १८/०८/२०२५**

**स्वाक्षरित/–**
**(मनोज उकिर्डे)**
**मुख्याधिकारी, न.प.अंबड**

संपादकीय

# उत्तरकाशीचा सांगावा

उत्तरकाशी दुर्घटनेचा सांगावा ओळखून काही शिकणार का, हा खरा प्रश्न आहे. अशा आपत्तींच्या वेळी परत परत ऐरणीवर येणारा मुद्दा आहे, तो निसर्गातील मानवाच्या वाढत्या हस्तक्षेपाचा.हिमालयीन पर्वतराजीत वसलेल्या उत्तराखंडसारख्या राज्याला नैसर्गिक आपत्ती काही नवीन नाहीत. ढगफुटीपासून महापुरापर्यंत आणि हिमस्खलनापासून भूकंपापर्यंत अनेक आपत्ती तिथे अधून मधून येत असतात. त्या नैसर्गिक असल्या, तरी निसर्गातील वाढत्या मानवी हस्तक्षेपामुळे, विकासाच्या कथित संकल्पनांतून साकारलेल्या प्रारूपामुळे आणि वेड्यावाकड्या बांधकामांमुळे त्या मानवी आपत्तीही ठरतात. अशा प्रकारच्या संकटांचे सूचन निसर्ग वेगवेगळ्या प्रकारे करीत असतो; परंतु त्यांकडे दुर्लक्ष करण्याची वृत्तीही विकसित झाली आहे. त्याची किंमत संकटांच्या वेळी चुकवावी लागते.

उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे सध्या आलेल्या आपत्तीत अशीच किंमत चुकवावी लागत आहे. तेथील धराली गावाच्या परिसरात ढगफुटी झाल्याचे सांगितले जात असून, त्यात आतापर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर शंभराहून अधिक बेपत्ता आहेत. धराली गावाचा निम्मा भाग चिखलात गेला असून, अनेक घरे आणि इमारती वाहून गेल्या आहेत. मदत आणि बचावकार्य सुरू असले, तरी पावसामुळे त्यात अडथळा येत असल्याचे दिसते. ही दुर्घटना ढगफुटीमुळे झाली की हिमस्खलनामुळे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे; कारण दुर्घटना घडली त्यावेळी जेमतेम ६.५ मिलिमीटर पाऊस झाल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे.

या काळात संपूर्ण उत्तरकाशी जिल्ह्यातील सर्वाधिक पाऊस २७ मिलिमीटर होता. इतक्या कमी पावसामुळे महापूर येण्याची शक्यता नसल्याकडे शास्त्रज्ञ अंगुलिनिर्देश करीत आहेत. शंभर चौरस किलोमीटर क्षेत्रफळात एका तासात शंभर मिलिमीटरहून अधिक पाऊस झाला, तर ढगफुटी झाली, असे मानले जाते. ही ढगफुटीची शास्त्रीय व्याख्या असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे धराली दुर्घटना ढगफुटीमुळे नव्हे, तर हिमस्खनामुळे घडली असण्याची शक्यता वर्तविली जाते. त्यामुळे ही शक्यताही तपासून पाहायला हवी.

उत्तराखंड हे उंचावरील ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून ८०० ते ६९०० मीटर उंचीवरील या राज्यात मोठ्या संख्येने हिमनद्या आहेत. एका पाहणीनुसार तिथे बाराशेहून अधिक हिमनद्या असून, त्यांपैकी काही धोकादायक आहेत. या हिमनद्यांमुळे उत्तरेकडील नद्यांना बारमाही पाणीपुरवठा होत असला, तरी पावसाळ्यात त्यांच्यामुळे धोकाही संभवतो. मोठा पाऊस झाला की तो हिमतलावांत साठून राहतो. मात्र, पाण्याची आवक वाढत राहिल्यास तलाव फुटून महापुराची स्थिती निर्माण होते. धराली गावातील सध्याची दुर्घटना याचमुळे झाली असावी, असा तज्ज्ञांचा कयास आहे. विद्यमान दुर्घटनेमागे ढगफुटीचे किंवा हिमस्खलनाचे कारण असले, तरी ते नेमकेपणाने जाणून घेणे आवश्यक आहे. अशा दुर्घटना टाळता येत नसल्या, तरी त्यांची शक्यता कमी करण्याचा प्रयत्न करता येतो. शिवाय, त्यामुळे कमीत कमी जीवितहानी होईल, या पद्धतीने नियोजन करता येते. किनारपट्टीच्या प्रदेशात चक्रीवादळामुळे होणारी जीवितहानी अशा प्रयत्नांद्वारे कमी करण्यात यश येत आहे.

# मुद्रेगावात साथ रोगाने नागरिक हवालदिल सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, पोटदुखीने १९० रुग्ण त्रस्त

## समृद्धी शुगर कारखान्याचे चेअरमन सतीश घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाचे टीम दाखल

अंबड ।प्रतिनिधी

वातावरणीय बदलांमुळे मुद्रेगावात साथ रोगाचे आजार बळावले आहेत. सर्दी, ताप, खोकला सडास अंगदुखी, पोटदुखीने नागरिक त्रस्त असून १९० पेक्षा जास्त नागरिक बेजार झाले आहेत. या परिस्थिवर नियंत्रण आणण्यासाठी समृद्धी शुगर कारखान्याचे चेअरमन सतीश घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाचे टीम विशेष प्रयत्न करत आहे.

घनसावंगी तालुक्यातील मुद्रेगाव येथे साथीचे आजार वाढलेत.ऊन, पाऊस मध्येच ढगाळ स्थिती,हलकासा पाऊस असे वातावरणात सतत बदल होतायत. त्यामुळे मागील काही दिवसांपासून सर्दी, ताप खोकला, अंगदुखी, पोटदुखी या आजाराने नागरिक त्रस्त झालेत.मोठ्यां प्रमाणेच लहान मुलांनाही घशात खवखव होणे, कान, नाकाच्या आजारांसह सर्दी, खोकला आणि तापासारख्या साथीच्या आजारांनी सरकारी दवाखान्यांन बरोबरच छोट्या खासगी दवाखान्यात



येणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही दुप्पटीने वाढ झालीय. विविध प्रकारच्या आजारांची लक्षणे दिसताच, दुखणं अंगावर न काढता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेण्याचं अवाहन आरोग्य विभागाचे प्रमुख अधिकारी डॉ टी एच ओ गायकवाड साहेब व आयुष्यमान भारत समिती तालुका अध्यक्ष सुदर्शन राऊत यांनी फोनवरून डॉक्टर साहेब व घाटगे साहेब यांना फोन करून डॉक्टर तात्काळ गाडी गावात बोलावली

प्रमुख उपस्थिती डॉ दहिभाते सी एच ओ डॉ श्री ए जे काकडे आरोग्य सहाय्यक श्रीमंती एस जी चांदवडे आरोग्य सेविका श्री महेश जी डाके आरोग्य सेवक सुवर्णा भुतेकर आशा सेविका बाळू काळे गावातील आयुष्यमान भारत समितीचे तालुका अध्यक्ष सुदर्शन राऊत अण्णासाहेब अंगद राऊत बालासाहेब राऊत गावातील नागरी व मोठ्या संख्येने उपस्थित होते अवश्य लाभ घेतला आहे.

# अजित पवारांनी गुंडांची टोळी पोसली– विजयकुमार घाडगे

बीड ।प्रतिनिधी

**राष्ट्रवादीच्या गुंडांनी माझ्यावर हल्ला केल्यानंतर मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. तेंव्हा त्यांनी ज्या पदाधिकाऱ्यांनी हल्ला केला त्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही, माणिकराव कोकाटे यांच्या बद्दल योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. कृषी मंत्री यांच्या बद्दल अजित पवार यांनी निर्णय घेतला मात्र, आमच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुंडांना पक्षाच्या फादर बॉडीत घेऊन अजित पवार यांनी नविन पायंडा पाडला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असा समज झाला आहे.**

की शेतकऱ्यांच्या विरुध्द राष्ट्रवादी अजित पवार गट आहे. शेतकऱ्यांच्या पोराला मारहाण करण्यासाठी अजित पवार यांनी गुंडांची टोळी ठेवली आहे का ? याला जशास तसे उत्तर छावा संघटना देत आहे. मात्र आम्ही या सरकारकडून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून त्याचा बदला पूर्ण करणार आहोत. निवडणुकीपूर्वी



शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण करूण घेणार आहोत. जर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले नाही तर नेत्यांना गाव बंदी करणार आहोत असा इशारा पत्रकार परिषदेत अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी दिला.

बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी बीड जिल्हाध्यक्षा अशोक रोमन यांच्यासह छावाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना विजयकुमार घाडगे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे सोडून राज्याचे कृषी मंत्री सभागृहात रम्मी खेळत असल्याने आंदोलनाचा भाग म्हणून आम्ही सुनिल तटकरे यांना लातूर मध्ये पत्ते भेट दिले होते. त्यानतर राष्ट्रवादीच्या गुंडानी माझ्यावर प्राणघातक हल्ला केला. अजित पवार यांनी कृषी मंत्री यांच्याबद्दल निर्णय घेतला. मात्र हल्ला करणाऱ्या गुंडांचा सन्मान करून त्यांना पक्षात मोठ स्थान दिल. शेतकऱ्यांच्या पोराने शासनाला प्रश्न विचारले तर राष्ट्रवादीचे हे गुंड त्यांच्यावर हल्ला करत आहेत. हे अजित पवार गटाला परवडणारे नाही. आम्ही याचा बदला शेतकऱ्यांच्या कापसाला १० हजार रूपये, सोयाबीनला ८ हजार रूपये हमी भाव घेऊन आणि पिक विमा शेतकऱ्यांच्या पदरात पाडून अशा भ्याड हल्याचा बदला घेणार असल्याचे जाहीर केले.या पत्रकार परिषेदेला अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाप्रमुख अशोक अण्णा रोमन, सभाजीनगर जिल्हाप्रमुख अशोक मोरे पाटील, लातूर जिल्हा प्रमुख दीपक नरवडे, जालना जिल्हाप्रमुख संदीप ताडगे यांच्यासह विद्यार्थी आघाडी प्रमुख पप्पू लांडे पाटील, शहर प्रमुख सचिन हरणमारे, पप्पू शिंदे, पप्पू मस्के पाटील, दत्ता काशीद, दत्ता साळुंके, शंकर,श कुरळे, बाळू कदम, विठ्ठल अण्णा काळे, सिद्दिकी फारुकी, वाजेद खान, अविनाश हातागळे, अमोल अंकुटे, सतीश मस्के, गिरीश करवा आदी उपस्थित होते.

## अशोक रोमन यांच्यावर लवकरच मोठी जबाबदारी

अशोक रोमन यांनी बीड जिल्ह्यातील गोरगरीबांच्या प्रश्नांवर आवाज उठवून ते शासन दरबारी सोडवण्याचा प्रामाणीक प्रयत्न केला आहे. या सोबतच युवकांची मोठी फळी त्यांच्या मागे आहे. लवकरच त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी दिली.



## भर पावसात गोदावरी पात्रामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

बीड ।प्रतिनिधी

गोदावरी नदी पात्रामध्ये छापा मारला असता पोलीसांना पाहून वाळू उपसा करणारे टॅक्टर, रोडर हे पळून गेले, पोलीसांनी टॅक्टर व रोडरचा पाठलाग करुन टॅक्टर व रोडर पकडले परंतु त्याचे दोन्ही चालक बाजुस असलेल्या शेतामध्ये पळुन गेले. गोदावरी नदीपात्रामध्ये अवैध वाळू उपसा करुन चोरटी वाहतुक करीत असलेल्या एक टॅक्टर व टॅक्टर रोडस असे एकुण ९,५०,०००/- रु मुद्देमाल जप्त करून दोन्ही पळून गेलेल्या चालकांविरुध्द पोलीस ठाणे गेवराई येथे रितसर गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये चालणाऱ्या विनापरवाना बेकायदेशिररित्या वाळू उपसा करणाऱ्या ईसमांवर कारवाई करण्याचे स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना आदेशित केले होते. त्यावरुन दिनांक १६.०८.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, मौजे म्हाळसपिंपळगांव शिवारातील गोदावरी नदी पात्रामध्ये अवैध विनापरवाना बेकायदेशिररित्या वाळू उपसा सुरु आहे. त्यावरुन पथकाने सदरील ठिकाणी जावुन अर्पणा रंगेहात पकडले. त्यांच्याविरुद्ध गेवराई पोलीस स्टेशनला गु.र.नं ४९२/२०२५ कलम ३०३(२),३(५) भारतीय न्यास संहीता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. असुन सदरील गुन्हयाचा पुढील तपास पोलीस ठाणे गेवराई हे करीत आहेत.

सदरील कामगिरी श्री नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, नितीन वडमारे, पोलीस अंमलदार अर्जुन यादव, आशपाक सय्यद, मनोज परजणे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

# देशसेवा वेल्फेअर फाउंडेशन व नजीर भैय्या मित्र मंडळातर्फे रक्तदान शिबिर संपन्न




जालना ।प्रतिनिधी

समाजसेवा हीच देशसेवा या विचाराने प्रेरित होऊन स्वातंत्र्य दिनानिमित्त देशसेवा वेल्फेअर फाउंडेशन आणि नजीर भैय्या मित्र मंडळातर्फे आयोजित रक्तदान शिबिर यशस्वीरित्या पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी राज्यमंत्री, आमदार आणि अंदाज समिती प्रमुख मा. श्री. अर्जुनरावजी खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिराला विष्णू भाऊ पाचफुले, पंडित दादा भुतेकर, नजीर भाई, जफर खान, चेतन भैय्या जांगडे, जफर मिर्झा, बिलाल सौदागर, अंकित शर्मा, तबरेज अली आदी मान्यवर उपस्थित होते. बसस्थानकाजवळील हजरत नूरशाह वाली दर्गाच्या सभागृहात हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

नूर हॉस्पिटल, वहरुडी येथील डॉ. फौजिया खान, डॉ. बुशरा पारेख, डॉ. राधिका मॅडम, श्री. करामात खान, श्री. शेख शकील आणि श्री. राहिल खान यांच्या रक्त संकलन टीमने रक्त गोळा केले. या शिबिराच्या यशाबद्दल देशसेवा वेल्फे अर फाउंडेशनचे कार्याध्यक्ष शेख सईद अब्दुल रफीक यांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देशसेवा वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख जावेद भाई, उपाध्यक्ष इरफान पठाण, सचिव रफिक रहमान शेख, शेख इरफान, अजीम खान, सिकंदर सैय्यद, अकबर शेख, फहीम शेख, सलीम शेख, अनीस शेख, नईम शेख, युसूफ शेख, शेख रहीम, रमजान शेख, शेख सोहेल, अरबाज शेख, सलमान शेख, शफीक मिर्झा, कृष्णा तापडिया, कलीम सैय्यद, अभिषेक ठाकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.



बीड – गुरुवर्य अँड. विजयकुमार देशपांडे साहेब यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा निमित्त त्यांचे मोरया हे पुस्तक भेट देऊन शुभेच्छा देताना नोटरी अँड.विलास जोशी सर आणि ज्येष्ठ सहकार महर्षी सुभाषसेठ सारडा.

## ओझार गणेश मंडळ पेठ बीडची कार्यकारीणी बहुमताने जाहिर

## अध्यक्षपदी ओंकार उपरे तर सचिवपदी गणेश मुळे

बीड ।प्रतिनिधी

ओझार गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग मामा चुंगडे यांच्या संकल्पनेनुसार गणेश मंडळाच्या बैठकीमध्ये बहुमताने ओझार गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात याली. यामध्ये अध्यक्षपदी ओंकार (पिंटू) उपरे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी राहुल गुंजाळ तर सचिवपदी गणेश मुळे यांची निवड करण्यात आली.

दिनांक १२/०८/२०२५ रोजी ओझार गणेश मंडळाच्या कार्यकारी मंडळाच्या निवडीबाबत बैठक संपन्न झाली.यावेळी ओझार गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग (मामा) चुंगडे तसेच भरतसिंग (मामा) चुंगडे, अभयशेठ बीडकर,रामप्रसाद राऊत, लक्ष्मण इगडे, सुरज चुंगडे, मुन्ना चुंगडे, शाकेर चौधरी, मंगलसिंग ठाकुर, आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.याबैठकीमध्ये जुन्या पदाधिकाऱ्यां वजी नविन तरुण मंडळीस प्राधान्य देवुन ओझार गणेश मंडळाचा कारभार त्यांच्या अधिकारात देवुन गणेश मंडळाची परंपरा कायम करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला. त्यानुसार,उर्वरित कार्यकारिणीमध्ये कोषाध्यक्षपदी जयदिप परळकर, व्यवस्थापक म्हणुन संस्कार मोरे यांची निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी उपरोक्त सर्व नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांनी गणेश मंडळामध्ये दर वर्षी प्रमाणे याही वर्षी अंधश्रध्दा निर्मुलणपर देखावा सादर करण्याबाबत ठरवले. यावर्षी आपल्या गणेश मंडळाचे नांव बीड शहरापुरते मर्यादीत न ठेवता संपुर्ण बीड जिल्हयामध्ये अंधश्रध्देवर उत्तम देखवा सादर करणारे मंडळ म्हणुन घेतले जाईल असे कार्य करणार असल्याची ग्वाही दिली.



बीड - कृष्णा सांगुळे यास सरस्वती दंत महाविद्यालय परभणी येथे मास्टर ऑफ डेंटल सर्जरी साठी प्रवेश मिळाला आहे. त्याच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी त्याला हार्दिक शुभेच्छा.



बीड – बीड जिल्हा राष्ट्र सेवादल कडून १५ऑगस्ट २०२५ भारतीय स्वातंत्र्य दिना निमित्त थोर स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार रामलिंग स्वामी यांचे नातू वैभव स्वामी यांचे पंतु लक्ष्मीकांत सौंदतिकार यांचा सत्कार करताना घाडगे जे बी.सर व आरसूळ सी. के. सर.

# स्वातंत्र्यदिनी अंबड मध्ये ध्वज संहितेची पायमल्ली
# दोषींवर कठोर कारवाई करा - गजानन मुळे







अंबड ।प्रतिनिधी

दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी देशात ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना,अंबड शहरातील जिल्हा व अप्पर सत्र न्यायालय,दिवाणी व फौजदारी न्यायालय तसेच सर्वच शासकीय कार्यालये,बँका आणि शाळांमध्ये राष्ट्रध्वज संहितेची सर्रास पायमल्ली झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एकीकडे 'हर घर तिरंगा'सारख्या मोहिमेतून राष्ट्रध्वजाचा सन्मान वाढवण्याचे आवाहन सरकार करत असताना,शासकीय कार्यालयांनीच दाखवलेली अनास्था अत्यंत संतापजनक आणि बेजबाबदारपणाची आहे.या गंभीर प्रकरणाची सखोल माहिती घेतली असता,अनेक गंभीर आणि नियमबाह्य बाबी उघडकीस आल्या आहेत. भारतीय ध्वज संहितेचे उल्लंघन... देशभरात सर्वसामान्य नागरिक आपापल्या घरांवर अभिमानाने तिरंगा फडकवत असताना अंबडमधील काही शासकीय कार्यालयांमध्ये साधे ध्वजारोहणही पार पडले नाही तर काही कार्यालये स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीही बंद होती तर काही ठिकाणी ध्वजारोहणासाठी कुठलीही व्यवस्था असल्याचे आढळून आले नाही.

राष्ट्रध्वजाचा अनादर : अनेक ठिकाणी तिरंगा गर्वाने फडकण्या ऐवजी दुर्लक्षित आणि मळलेल्या अवस्थेत फडकत होता काही ठिकाणी इमारतीच्या मध्यभागी असण्याऐवजी तो एका कोपऱ्यामध्ये लावलेला असल्याचे आढळून आले तर काही ठिकाणी तिरपट तसेच काही ठिकाणी कमी उंचीवर लावण्यात आल्याचे दिसून आले.काही ठिकाणी इमारत मोठी व ध्वजस्तंभ इमारतीच्या आकाराच्या प्रमाणात नसल्याचे आढळून आले त्यामुळे राष्ट्रध्वजाचा सन्मान झाला नाही.

देखरेखीचा अभाव : ध्वजारोहणानंतर ध्वजाची देखरेख करण्यासाठी क्वचितच कर्मचारी उपस्थित असल्याचे आढळून आले तर इतर सर्वच कार्यालयांनी राष्ट्रध्वज हा बेवारस सोडलेले आढळून आले तर अनेक कार्यालये रस्त्यालगत असूनही झाडामुळे राष्ट्रध्वज झाकला गेल्याने तो दिसत नव्हता रस्त्यावरून स्पष्ट दिसत नसल्याचे आढळून आले त्यामुळे राष्ट्रध्वजाचा सन्मान झाला नाही.

राष्ट्रीय उत्सवाचे उदास चित्र : तर काही ठिकाणी कुठल्याही प्रकारची स्वच्छता,सजावट,रोषणाई,रांगोळी दिसून आली नाही ज्यातून राष्ट्रध्वजाबद्दल आदर वाढेल.

कायदेशीर लढाईचा एल्गार :

या गंभीर प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते गजानन मुळे यांनी सांगितले की, माझ्याकडे या सर्व घटनांची माहिती उपलब्ध आहे तसेचमी संबंधित कार्यालयांमधील ध्वजारोहण अहवालही माघवून घेणार आहे.एकीकडे शासन 'हर घर तिरंगा' मोहिमेतून नागरिकांना राष्ट्रध्वजाचा सन्मान शिकवत असताना,शासकीय कार्यालयेच कायदे मोडत आहेत,हे बेकायदेशीर आहे.मी लवकरच या विरोधात तक्रार दाखल करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करणार आहे असे सांगितले.

मुळेंनी केवळ कारवाईची मागणी केली नसून,राष्ट्रीय ध्वज संहितेत बदल करून,राष्ट्रध्वजाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची आणि अधिक कठोर कायदे करण्याची मागणी केंद्र सरकारकडे करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.शासकीय यंत्रणेनेच राष्ट्रध्वजाचा अपमान करणे हे अक्षम्य आहे,असा इशाराच त्यांनी दिला आहे.

या घटनेला केवळ एक बातमी म्हणून पाहू नये,तर हा राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी सुरू झालेल्या एका नव्या कायदेशीर लढाईचा एल्गार आहे याची लोकचळवळ होवून ही लढाई जिंकली जावी हीच अपेक्षा.



## श्री रेणुका देवी शरद सहकारी साखर कारखान्याचे ध्वजारोहण आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते संपन्न

पैठण ।प्रतिनिधी


पैठण तालुक्यातील चोंढाळा येथील रेणुका देवी शरद सहकारी साखर कारखान्याचे ध्वजारोहण पैठण तालुक्याचे आमदार विलास बापू भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वातंत्र्याचा हा पावन दिवस आपल्या प्रत्येकाच्या

मनात देश प्रेमाची नवी ऊर्जा आणि आपल्या भावी पिढीने देशप्रेम शिस्त कर्तव्य भावना यांचे संस्कार आत्मसात करण्याचे आव्हान यावेळी भुमरे यांनी केले. यावेळी उपस्थित शरद सहकारी साखर कारखान्याचे अधिकारी पदाधिकारी व शिवसेना कार्यकर्ते चोढाळा गावातील ध्वजारोहण निमित्त नागरिक उपस्थित होते.

## जेलमध्ये टाकलेल्या नानासाहेब जोगदंड व संतोषराजे जाधव यांच्या कुटुंबीयांची छावाचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी घेतली भेट

घनसावंगी ।प्रतिनिधी

अखिल भारतीय छावा संघटनेचे वि.आ.प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी अखिल भारतीय छावा संघटनेचे घनसावंगी तालुकाध्यक्ष नानासाहेब जोगदंड व संतोष जाधव यांचा परिवारासह सत्कार केला व आंदोलन दरम्यान जे खोटे गुन्हे दाखल झाले त्याबाबत त्यांच्या परिवाराला आधार देत संघर्ष करण्याबद्दल त्यांचे मनोधैर्य वाढवून खंबीर आधार दिला.



यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रवादीच्या गुंडानी आमच्यावर हल्ला केल्यानंतर जालन्यात आंदोलन झाले. त्या आंदोलनात खोटे गुन्हे आमच्या सहकाऱ्यावर नोंदविण्यात आले त्यात घनसांवगी तालुकाध्यक्ष नानासाहेब जोगदंड व संतोषराजे जाधव यांना अटक झाली होती तब्बल वीस दिवसानंतर त्यांची जेलमधुन सुटका झाली.जेलमध्ये जाऊन आल्यानंतर त्यांचा परिवार नाराज असेल असा अंदाज आमच्या मनात होता परंतु त्यांनी स्पष्ट सांगितले कि आमचा मुलगा शेतकऱ्यांच्या पोरांवर हल्ला झाला म्हनुन आंदोलन करुन जेलमध्ये गेला याचा आम्हाला आभिमान आहे. या शब्दाने शेतकऱ्यांची लढण्यासाठी दहा हत्तीचे बळ आम्हाला मिळाले असे त्यांनी सांगितले. यावेळी गावकऱ्यांनी या लढ्याचे समर्थन केले व शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, शेतीमालाला भाव व पिकविमा या आंदोलनात संपुर्ण गाव तुमच्या पाठीशी आहे असा शब्द दिला.यावेळी संतोष आण्णा जेधे,विलास बापु कोल्हे,जालना जिल्हाप्रमुख संदीप ताडगे पाटील,जिल्हाप्रमुख राधेशाम पवळ,लातुर जिल्हाप्रमुख दिपकराव नरवडे,मनोज लंगर,मनोज फेसाटे,शिवनाथ काळवने,दस साळुंके,मच्छीद्रं घोगरे,उमेश गव्हाने,सुरेश जाधव, लक्ष्मण साबळे,बंटी गायकवाड गावचे सरपंच व गावातील प्रतिष्ठीत नागरीक उपस्थीत


## तळणीस पुन्हा ढगफुटीसदृश्य पाऊस, खरीप पिकांचे प्रचंड नुकसान,शेतकरी हतबल

तळणी ।प्रतिनिधी

तळणी मंडळात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी व जोरदार पावसाने रविवारी सकाळी अक्षरशः रौद्ररूप धारण केले. पहाटे तीन ते सहा या अवघ्या तीन तासांत झालेल्या तुफानी पावसामुळे अनेक शेतशिवारात गुडघाभर पाणी साचले असून, शेतांचे बांध फुटून खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

गेल्या पंधरवड्यातच तळणी कृषी मंडळात १४७ मिमी पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे आधीच खरीप पिकांना मोठा फटका बसला होता. त्यात भर घालत रविवारी झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे शेतकरी आर्थिक व मानसिकदृष्ट्या कोसळला आहे.सुरुवातीला वेळेत पेरण्या झाल्याने शेतकरी समाधानी होता. परंतु सततच्या पावसामुळे पिकांची वाढ खुंटली. शेतात साचलेल्या पाण्यामुळे सोयाबीनचे पीक पूर्णपणे वाया गेले आहे. तुरीचे पीक पूर्णतः गेल्यात जमा झाले असून कपाशीची अवस्था गंभीर आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या वर्षी झाडांना शेंगा लागत नाहीत, तूर तर पूर्णतः गेली आहे आणि कपाशीही नाशाच्या मार्गावर आहे.

मागील अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांनी शासनाकडे मदतीची मागणी केली होती. आमदार बबनराव लोणीकर यांनी तळणी परिसराची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला होता. मात्र शासनाकडून अद्याप ठोस निर्णय आलेला नाही.तळणी मंडळातील खरीपाच्या २२ हजार ८८१ हेक्टर क्षेत्रापैकी २० हजार ७०९ हेक्टरवर खरीपाची पेरणी झाली होती. त्यात कपाशी - ७ हजार ३५८, सोयाबीन - १० हजार १६६, तूर - २ हजार ३२,



मुग - ८५४, उडीद - ४९६ हेक्टरवर पेरणी करण्यात आली होती. जवळपास २० हजार हेक्टरवरील पिकांना पुन्हा एकदा फटका बसल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

ओला दुष्काळ जाहीर करा- शेतकरी

तळणीतील शेतकरी दत्तराव खरात यांनी सांगितले की, यावर्षी खरीप हंगामातील तूर, कपाशी, सोयाबीन यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे झाडांना शेंगा लागत नाहीत, तूर पूर्णतः गेली आहे, कपाशीही गेल्यात जमा आहे. शासनाने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावी.

शासनस्तरावर पाठपुरावा सुरू - आमदार लोणीकर

अतिवृष्टी झालेल्या मंडळाची संपूर्ण माहिती मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे सादर केली आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे असे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

## सैनिकी विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण !!



बीड ।प्रतिनिधी

सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड येथे प्राचार्य श्री सचिन पवार सर यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण संचलित सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथे १५ ऑगेस्ट रोजी स्वातंत्र्य दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . प्राचार्य श्री सचिन पवार सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सैनिकी विद्यार्थ्यांनी यावेळी सैनिकी पद्धतीचे संचलन करून देशभक्तीचे वातावरण निर्माण केले. प्राचार्य श्री सचिन पवार सर, सेनापदक विजेते मेघराज कोल्हे, शिक्षण निदेशक विजयकुमार धारणकर व डॉ अविनाश बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली ध्वजारोहण, सैनिकी प्लाटूनचे संचलन व मास पी टी आदी आयोजन पाऊस सुरू असताना ही यशस्वीपणे करण्यात आले. यावेळी भारत माता की जय अशा घोषणांनी हा संपूर्ण परिसर दुमदुमला. सैनिक विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी व पालकही मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# पुण्यात जबरी चोरी करणारे तिघे बीडमध्ये अटक

## आंतरजिल्हा पोलीस समन्वय्याने मिळाले आरोपी

बीड ।प्रतिनिधी

आंतरजिल्हा गुन्हेगारावर नजर ठेवावी आणि वेळीच त्यांना अटक करावी अशा सक्त सूचना पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सर्व पोलिसांना दिलेले आहेत. त्यानुसार पुण्यातील तीन जबरी चोरांना बीडमध्ये मोठ्या शिताफिने पोलिसांनी अटक केली आहे. या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

घटनेची हकीगत अशी की, दिनांक १२/०८/२०२५ रोजी मौजे कुरुळी, ता.खेड जि.पुणे या भागात कमलाकर बाबाजी मोहिते हे सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पिकअप गाडीने जात असताना तीन अनोळखी इसमानी त्याचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवून त्यांना आरोपींच्या मारुती स्विफ्ट या गाडीत शिवीगाळ व मारहाण करून बसवले व मुळशेवाडी येथे इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे नेऊन लूटमार करण्यात आली होती आणि यामध्ये कमलाकर मोहिते यांच्या बँक



खात्यात पैसे नसल्याने आरोपींनी त्यांना त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीकडून फोनपे च्या माध्यमातून २४३०० रुपये घेतले तसेच त्यांच्याकडील रोख रक्कम १५००० रुपये व महाराष्ट्र बँकेचे ए टी एम कार्ड असा एकूण ३९५०० रुपयाचा ऐवज लुटण्यात आला होता.. या गुन्ह्यातील तीन आरोपी नामे १. नितिन मधुकर शिंदे, वय २६ वर्ष, रा. चाकण, पुणे २. वैभव गीताराम माने, वय २३ वर्ष, रा. चाकण, पुणे ३. विशाल ज्ञानोबा जाधव, वय ३२ वर्ष, रा. रमाई चौक, बीड हे गुन्हा करून फरार झाले होते परंतु पोलीस ठाणे म्हाळुंगे यांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की ते बीडमध्ये आलेले आहेत... सकाळी त्याचा संदेश आल्यानंतर बीड शहर डीबी पथकाचे पीएसआय महेश जाधव आणि पोह राठोड, बावनकर, पोअ राम पवार यांनी त्यांचा शहरभर शोध घेतला असता त्यांना एके ठिकाणी त्यांची गाडी लावलेली आढळून आली. त्या ठिकाणी मग सापळा रचला परंतु दिवसभर ते त्या सापळ्यामध्ये अडकले नाही परंतु रात्री साडेदहाच्या सुमारास ते अलगद त्या सापळ्यात अडकले आणि तिघेही आरोपी पोलिसांच्या हाती लागले.

या संपूर्ण प्रकरणांमध्ये पुणे पोलीस आणि बीड शहर पोलीस यांचा समन्वय अनोखा ठरला.अशाप्रकारे समन्वयातून अंतर जिल्हा गुन्हे करणारी टोळी ही पकडण्यात आलेली आहे. येथेही त्यांचा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याचा उद्देश होता हे तपासा स्पष्ट झाले आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ यांचे बीड शहर डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह राठोड, पोह बावनकर, पोअ पवार केली आहे.

### फॅशन शोमध्ये शौर्यची कामगिरी

## बीडमध्ये तुलसी समूहाकडून चॅम्प ऑन रॅम्प स्पर्धा

बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या वतीने रविवारी (दि.१७ ऑगस्ट) चॅम्प ऑन रॅम्प या राज्यस्तरीय लहान मुलांच्या फॅशन शोचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधून लहानग्या स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला. रॅम्पवरच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून प्रत्येकाने आपले कौशल्य दाखवले.

याच स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलचा शौर्य सुनील डोंगरे या लहानग्या स्पर्धकाने ३ ते ६ वयोगटात थेट टॉप-५ मध्ये स्थान मिळवत राज्य पातळीवर बीडचा झेंडा फडकावला. शौर्यच्या या यशामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

तुलसी एज्युकेशनचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून चॅम्प ऑन रॅम्प सिजन एक ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यावेळी आयकर विभागाच्या उपआयुक्त श्रीमती नितीका विलास, चला हवा येऊ द्या फेम प्रसिद्ध विनोदी अभिनेते अंकुर वधावे, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती दीपा रोडे यांचा समावेश होता. या सर्व मान्यवरांनी शौर्यच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे आणि मिळालेल्या यशाचे कौतुक केले.




तुलसी इंग्लिश स्कूलच्या यूकेजी वर्गाच्या शिक्षिका फातिमा शेख यांनी विद्यार्थ्यांची अतिशय उत्तम तयारी करून घेतली होती. प्राचार्या उमा जगतकर, शिक्षिका फातिमा शेख तसेच शौर्यचे आई-वडील यांच्या सततच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाले. शौर्यने आपल्या नैसर्गिक आकर्षक व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास व प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. शौर्यच्या पुढील शैक्षणिक व कलागुणांच्या प्रवासासाठी सर्व स्तरातून त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# बीड येथे होणाऱ्या ४४ व्या राज्यस्तरीय योगासन स्पोर्ट्स चैंपियनशीप बीड २०२५ चे स्वागताध्यक्ष संतोषसेठ सोहनी यांची प्रगट मुलाखत...



बीड - महाराष्ट्र योग असोसिएशन, बीड डिस्ट्रीक्ट योग असोसिएशन व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी., बीड येथे दि. २२, २३, २४ ऑगस्ट २०२५ रोजी ४४ वी राज्यस्तरीय योगासन स्पोर्टस चैंपियनशीप २०२५ चे आयोजन केले गेले आहे. या निमिताने या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष, प्रसिध्द समाजसेवक तथा बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे जिल्हा अध्यक्ष श्री. संतोष (सेठ) सोहनी यांची घेतलेली मुलाखत त्यांच्याच शब्दात....

**प्रश्न :- आपले पूर्ण नाव व थोडक्यात परिचय ?**

उत्तर :- माझे पूर्ण नांव संतोष जगन्नाथ सोहनी आहे. माझा मोंढा भागात ट्रेडिंगचा व्यवसाय असून बीड एम.आय.डी.सी. मध्ये माँ वैष्णो पॅलेस हे मंगल कार्यालय व लॉन्स मी बीडकरांच्या सेवेसाठी सुरु केलेले आहे.

**प्रश्न :- स्वतः च्या व्यवसाया सोबत आपल्याकडे व्यापारी संघटनेची कोणती जबाबदारी आहे ?**

उत्तर:- माझ्याकडे व्यापारी संघटनेने (उ-खढ) बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिलेली आहे. त्यासोबतच व्यापारी महासंघाच्या मराठवाडा अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची माझ्याकडे जबाबदारी आहे.

**प्रश्न- आपली ४४ व्या राज्यस्तरीय योगासन स्पोर्ट चैंपियनशीपच्या स्वागताध्यक्ष पदावर निवड कशी झाली ?**

उत्तर - योग ही आपल्या भारत देशाची गौरवशाली परंपरा आहे. या देशात हजारो वर्षांपासून योगाची साधना केली जाते. आपले पूर्वज योगी होते. योगाचा जन्म भारत देशात झालेला आहे. सध्याच्या आधुनिक युगात शारीरिक व मानसिक व्याधी दूर करण्यासाठी योगासने सर्वोत्तम उपाय आहेत. म्हणून योगासनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ही राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यासाठी बीड शहरात बैठक घेण्यात आली. तेंव्हा सर्वांनुसते स्वागताध्यक्ष म्हणून माझ्या नावाची निवड करण्यात आली.

**प्रश्न - या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन कोण करत आहे ?**

उत्तर:-योगा फेडरेशन ऑफ इंडियाची स्थापना १९७४ मध्ये हरियाणा येथे चेअरमन अशोककुमार अग्रवाल यांनी केला असून सध्या ते आशियाई योगा फैडरेशनचे चेअरमन आहेत. योगा फेडरेशन ऑफ इंडियाच्या संलग्नतेने महाराष्ट्र योग असोसिएशन ने ही स्पर्धा बीड येथे घेण्यासाठी बीड डिस्ट्रीक्ट योग असोसिएशन व महाराष्ट्र शिक्षक परिषद प्राथमिक विभाग, बीड यांना परवानगी देण्यात आली आहे. या सर्वाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**प्रश्न - या स्पर्धेचे स्वरूप कसे आहे ?**

उत्तर - योगा फेडरेशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेचे हे गोल्डन ज्युबली वर्ष आहे.१९७४ पासून सुरु झालेल्या स्पर्धाला यावर्षी २०२५ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत असून ५० व्या राष्ट्रीय योगा चैंपियनशीप स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ, बीड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेमधुन निवडला जाणार आहे. वय वर्ष ८ पासून ७० वयापर्यंतचे वेगवेगळ्या गटातील जिल्ह्यास्तरीय स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक मिळालेले मुले, मुली, महिला, पुरुष खेळाडू या स्पर्धेत भाग घेण्यासाठी बीड शहरात येणार आहे.

**प्रश्न:- या स्पर्धेचे आयोजन कुठे व कधी होणार आहे ?**

उत्तर :- बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी. आकाशवाणी समोर, बीड येथे ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. दि. २२ ऑगस्ट वार शुक्रवार रोजी सायंकाळी ०४ नंतर योग खेळाडू बीड शहरात दाखल होतील. दि. २३ ऑगस्ट २०२४ वार शनिवार रोजी सकाळी ८ वाजता स्पर्धेला तीन वेगवेगळ्या स्टेजवर सुरुवात होईल. शनिवार २३ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ०४.०० ते ६.०० या वेळेत प्रमुख अतिर्थीच्या उपस्थितीत स्पर्धेचे अधिकृतरित्या उद्घाटन होईल. उद्घाटन कार्यक्रम नंतर शनिवारी सायंकाळी ६.०० ते १०.०० वाजेपर्यंत स्पर्धा चालेल. रविवार, सकाळी ८.०० ते १.०० या वेळेत स्पर्धा संपन्न होईल. स्पर्धेचे बक्षीस वितरण रविवार दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न होईल. त्यानंतर



सायंकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत या स्पर्धेतून ५० व्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवडलेल्या महाराष्ट्राच्या संघाची घोषणा करण्यात येवून त्यांचे डॉक्यूमेंटेशन केले जाईल.

**प्रश्न :- या स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेल्या स्पर्धा आयोजन समितीमध्ये तुमच्या सोबत आणखी कोण आहेत ?**

उत्तर :-भारतीय योग संघाचे प्रशिक्षक तथा कर्णधार श्री. चंद्रकांत पांगारे (पुणे), महाराष्ट्र योग असोसिएशनचे अध्यक्ष सौ. अनिता पाटील (जळगांव) व सचिव श्री. जतीन सोळंकी (श्रीरामपुर) यांच्या मार्गदर्शनाखाली बीड डिस्ट्रीक्ट योग असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विनायकराव वझे व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीडचे जिल्हाध्यक्ष श्री. विकास गवते, स्पर्धा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष श्री. सचिन (तात्या ढेपे) व कार्याध्यक्ष श्री. प्रदिप (दादा) क्षीरसागर, अर्थ समितीचे प्रमुख श्री. रामचंद्र ठोसर, बाबासाहेब कुडके, भोजन समितीचे प्रमुख श्री. माधव काळकुटे, विष्णु कानगांवकर, निवास समितीचे प्रमुख अध्यक्ष श्री. सुहास लोहिया व अविनाश इगडे, महिला समितीच्या ॲड. गीता वझे व प्रविणा वाघमारे, नोंदणी विभागाचे प्रमुख बाळासाहेब पवार, संतोष पडुळे, लक्ष्मण मळेकर, रामकृष्ण राऊत हे स्पर्धा आयोजन यशस्वी करण्याकरीता परिश्रम घेत आहेत.

**प्रश्न :- महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आयोजन खर्च कोण करत आहे ?**

उत्तर:- ही स्पर्धा बीड शहरातील योगाची आवड असणाऱ्या दान-दात्यांनी दिलेल्या देणगी मधून संपन्न होत आहे. तसेच बीड शहरातील दानशूर व्यक्ती, बँका, पतसंस्था रोटरी क्लब व्यापारी महासंघ यांना या स्पर्धेसाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रश्न :- बीडसारख्या भागात ही स्पर्धा आयोजनाचा हेतू काय आहे ?**

उत्तर :- मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर या सारख्या मेट्रो शहराच्या मानाने आपला बीड जिल्हा स्पर्धात्मक योगामध्ये आणखी मागे आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड मध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर गेल्या दहा वर्षात योग स्पर्धेमध्ये विजयी झालेले खेळाडू येणार असून स्पर्धात्मक योगासने, पाहण्याची सुवर्णसंधी या निमिताने बीड जिल्ह्यातील नागरिकांना मिळणार आहे. यामुळे भविष्यात बीड जिल्ह्यात योगासनांचे चांगले खेळाडू निश्चित तयार होतील.

**प्रश्न :- या स्पर्धेच्या निमिताने आपले बीड जिल्ह्यातील जनतेला काय आवाहन आहे ?**

उत्तर:- बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच योगासनांची राज्यस्तरीय स्पर्धा होत असून यास्पर्धेतून देश पातळीवर होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगासन चैंपीयनशिपसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला जाणारा आहे. तरी सर्व नागरिकांनी आपल्या पाल्यांसह या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन या स्पर्धेचा स्वागताध्यक्ष म्हणून मी श्री. संतोष जगन्नाथ सोहनी करत आहे.



जालना ।प्रतिनिधी

वनविभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक जालना दक्षिण कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी शेख इसाक शेख मोहम्मद यांनी कार्यालयीन व्यवस्थापन, नागरिकाभिमुख सेवा आणि पारदर्शक कार्यप्रणाली तसेच विविध कामे उत्कृष्ट रित्या व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने प्रमोदचंद लाकरा (भा.व.से) वनसंरक्षक प्रादेशिक वनवृत्त छत्रपती संभाजीनगर, मा.सुवर्णा माने (भा.व.से) छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयाकडून शेख इसाक शेख मोहम्मद यांना त्यांच्या कार्यालयीन कामकाजातील उत्कृष्ट व उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रशस्तिपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.सदर कार्यक्रम वनसंरक्षक कार्यालय छ.संभाजीनगर येथे पार पडला यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

# माजी मुख्याध्यापकांनी भारतीय स्वातंत्र्य दिन इंग्लंडमध्ये साजरा केला

## इंग्लंड येथे हिंमत नाटकर यांना भेटायला गेलेल्या माजी मुख्याध्यापक गणपतराव नाटकर यानी राष्ट्रीय एकात्मतेचा दिला संदेश

बीड ।प्रतिनिधी

इंग्लंड येथे स्थायिक असणाऱ्या हिंमत नाटकर या आपल्या मुलाला भेटायला गेलेल्या माजी मुख्याध्यापकाचे भारतीय प्रेम, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन भारतामध्ये झेंडावंदन साजरा करण्यासाठी उपस्थित नसल्याने थेट इंग्लंड येथे माजी मुख्यध्यापक गणपतराव नाटकर यांनी झेंडावंदन करून भारतीय एकात्मतेचा संदेश देत इंग्लंडमध्ये भारत माता की जय घोषणा दिल्या गणपतराव नाटकर यांच्या या भारतीय प्रेमाबद्दल भारतातून शुभेच्छाचे वर्षाव करण्यात येत आहे गणपत नाटकर मूळ गेवराई तालुक्यातील तलवाडा या गावचे आहेत त्यांचा मुलगा हिमत नाटकर इंग्लड येथे स्थायिक असल्याने भेटायला आलेले माजी मुख्याध्यापक गणपतराव नाटकर यांनी १५ ऑगस्ट दिन साजरा इंग्लंड येथे केला आहे त्यांच्या या राष्ट्र प्रेमाला सर्वांनी शुभेच्छा दिल्या असून माजी आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह राजे पंडित, जयसिंह पंडित यांच्या सह तलवाडा करांनी अभिनंदन कौतुक केले आहे





गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील न्यू इरा पब्लिक स्कूल मध्ये १५ ऑगस्ट निमित्त मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून स्वतंत्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गेवराई शहरातील न्यू इरा पब्लिक स्कूल मध्ये स्वतंत्र दिना निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर हे होते तर व्यासपीठावर मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्राचार्या वर्षा क्षीरसागर, श्रीनिवास क्षीरसागर, केशव ढाकणे यांची उपस्थिती होती.ध्वजारोहण कार्यक्रमा नंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिना निमित्त भाषणे केली.पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नानासाहेब कडू व आण्णासाहेब गायकवाड यांनी केले.

## बीड शहरातील नामांकित व्यक्ती दत्ताभाऊ थिगळे हे काळाच्या पडद्याआड

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नामांकित व्यक्ती दत्ताभाऊ थिगळे हे काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे बीड शहरांमध्ये शोक कळा पसरली आहे. दत्ताभाऊ थिगळे यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार शनिवारी सकाळी साडे आठच्या दरम्यान मोंढा रोड येथील अमरधाम या स्मशान भूमी मध्ये करण्यात आला.



त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वराकडे प्रार्थना भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा श्री सोमेश्वर महादेव मंदिर तसेच महारुद्र मंदिर ट्रस्ट फाउंडेशनचे विश्वस्त नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी त्यांच्या परिवाराच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली.






जाफराबाद - जाफराबाद येथे १५ ऑगस्ट स्वतंत्र दिना निमित्त गणपती इंग्लिश स्कूल राजुर या शाळेतील चिमुकल्या युवराज गजानन डिक्कर या विद्यार्थ्यांने क्रांतीज्योतीबा महात्मा फुले यांची वेशभूषा परिधान केली होती.याचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.

# निवडुंग वाडी येथे आज पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील निवडुंगवाडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री गुरु बंकट स्वामी महाराज, राष्ट्रीय संत भगवान बाबा, श्री गुरु एकनाथ बाबा, व वामन भाऊ यांच्या कृपाशीर्वादाने आज दिनांक १८ ऑगस्ट पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू होत आहे.

निवडुंग वाडी येथे सर्व गावकरी एकत्रित येऊन सप्ताहाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये साजरा करतात प्रथम कलश पूजन आणि कार्यक्रमाची सुरुवात केली जाते.या सप्ताहाचे यावर्षीचे खास वैशिष्ट्य म्हणजे ह भ प कृष्णानंद मुंडे महाराज यांची शिव महापुराण कथा एक ते चार या वेळेत आयोजित केली आहे. तसेच या कार्यक्रमात सकाळी पहाटे काकडा ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन दुपारी भोजन एक ते चार शिव महापुराण कथा हरिपाठ त्यानंतर संध्याकाळी ख्यातनाम महाराजांचे कीर्तन होणार आहेत. कीर्तनानंतर शेजारील गावचे जागर असे दैनंदिन कार्यक्रम आयोजित केले आहेत. कीर्तन सेवेमध्ये अनुक्रमे ह भ प केशव महाराज घुले शास्त्री टाकळी, ह भ प उद्धव महाराज चोले खडकी घाट, ह भ प भागवताचार्य अंजलीताई केंद्रे उदगीर, ह भ प व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, परमपूज्य श्री ऋषिराज बाबा परांडेकर, महंत ह भ प आप्पासाहेब चौरे महाराज चोंडी ह भ प प्रकाश महाराज साठे विनोदाचार्य व शेवटी पंचवीस ऑगस्ट या दिवशी हरिभक्ति परायण रतन महाराज सासुरेकर मठाधिपती सासुरा यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. त्यानंतर गावकरी मंडळी तर्फे महाप्रसाद होईल. अशी माहिती मा सरपंच प्रा. तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# शेतकरीपुत्र खा.बजरंग सोनवणे भरपावसात शेतकऱ्यांच्या बांधावर ; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिला धीर

## केज तालुक्यात मांजरा नदीच्या पाण्याने ओलांडले पात्र,शेती, पिकांसह घरांचेही अतोनात नुकसान

बीड/प्रतिनिधी

सलग दोन दिवस धो-धो पाऊस पडल्याने केज तालुक्यात मांजरा नदीतील पाण्याने पात्र सोडले.संपूर्ण मांजरा काठ आणि जवळपास सात गावातील नदी पात्रा शेजारील शेतात पाणी शिरले. उभे पिक वाहून गेलेच पण शेती ही खरडून गेली. डोळ्यादेखत होत्याचे नव्हते झाले.अनेकांच्या राहत्या घराचीही पडझड झाली.यावेळी ज्यांच्या त्यांच्या डोळ्यात पाणी उतरले. दुपारी १२ वाजता खा.सोनवणे यांना या गावांमधून फोन आले. यानंतर सोनवणे यांनी नियोजीत दौरा रद्द करून तातडीने क्षतीग्रस्त गावे गाठली. यावेळी पाऊस सुरूच होता.पडत्या पावसात खा.बजरंग सोनवणे शेतात पोहचले. नुकसानीची पाहणी केली.शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, असा शब्दही शेतकऱ्यांना दिला.

बीड जिल्ह्यात काही दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे.दि. १५ ऑगस्ट रोजी पहाटे बीडतालुक्यातील पाली, नाळवंडी,चौसाळा, नेकनूर,लिंबागणेश, पाटोदा तालुक्यात पाटोदा,थेरला,गेवराई तालुक्यात धोंडराई, रेवकी,तलवाडा,केज तालुक्यात संपूर्ण मांजरा काठ व युसूफ वडगाव,बनसारोळा, नांदूरघाट,परळी तालुक्यात नागापूर, सिरसाळा,शिरूर तालुक्यातील तिंतरवणी,ब्रम्हनाथ येळंब या महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे.याच बरोबर दि.१६ ऑगस्ट च्या पहाटे ही पावसाने हजेरी लावली असून इतर अनेक ठिकाणी सुद्धा पिके पाण्यात आहेत.तर काही ठिकाणी नदीचे पात्र ओलांडून पाणी शेतात शिरले आहेत.केज तालुक्यातील मांजरा नदी दुथडी भरून वाहत असून



राजेगाव,दैठणा, बोरगाव,भोपला,हदगाव,डोका व लाखा या सात गावासह संपूर्ण मांजरा पट्ट्यातील गावे क्षती ग्रस्त झालेली आहेत. उभ्या पिकांचे नुकसान झाले आहेच पण जमीनीही खरडून गेल्या आहेत.अनेक वस्त्यांमधे पाणी आले असून घरांची पडझड झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांना दिली. दरम्यान,खा.बजरंग सोनवणे यांनी दिवस भरातील विविध कार्यक्रमांचे दौरे रद्द करत तातडीनेक्षतीग्रस्त गावात जावून भेट देण्याचा निर्णय घेतला. राजेगाव येथे ते पोहचले तेव्हा पाऊस सुरूच होता.पडत्या पावसात खा.बजरंग सोनवणे हे शेतातील पाण्यात उतरले.यावेळी पाण्यातील पिकांची काय अवस्था झाली आहे,हे स्वत: पाहिले. संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधला.यावेळी शेतकऱ्यांच्या डोळ्यात आलेले अश्रू पुसण्याचे ही काम खा.सोनवणे यांनी केले.पुढे,दैठणा, बोरगाव,भोपला,लाखा या गावातील नदीपात्रा शेजारील शेतात जिथे पाणी शिरले आहे,अशा ठिकाणी पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी धीर तर दिलाच पण तुमच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी राज्य सरकार व जिल्हा प्रशासनाला बोलत आहे.संकटाच्याकाळात शासनाने तात्काळ हस्तक्षेप करूनशेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा,अशी अपेक्षाही व्यक्त केली.मदत मिळवून देण्यासाठी आपल्याला शासन स्तरावर जे जे करावे लागेल,ते आपण करू, असा शब्दही त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

# विद्यार्थ्यांचा विकास हाच आमचा ध्यास - श्रीमती बावचकर

भालगाव येथील शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

केज/प्रतिनिधी

शालेय जीवनातील महत्त्वाचा टप्पा आणि विद्यार्थ्यांचा भावी वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या स्पर्धा परीक्षेतील एम टी एस या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ भालगाव -१ येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. व्यासपीठावर ग्रामसेवक पुजारी, प्रशासक चौरे,युवराज ढोबळे,बालासाहेब मोरे, अमीन पठाण,मयूर सुरवसे,गिरी भगवान, उत्तमराव सुरवसे मेजर, राजेभाऊ मोरे मेजर, अरविंद मोरे उपस्थित होते.जिद्द आणि कष्ट याला मार्गदर्शनाची साथ मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो म्हणून विद्यार्थ्यांचा विकास हाच आमचा ध्यास असल्याचे शाळेच्या शिक्षिका श्रीमती बावचकर बोलताना सांगितले.भालगाव १ येथील जिल्हा परिषद शाळेतून एम टी एस या शासनाच्या मान्यता प्राप्त स्पर्धा परीक्षेत आरोही गोविंद कांबळे व कृष्णिका शरण मिटकरी यांनी गोल्ड मेडल,सिद्धी खंडू विभुते,सृष्टी



बापूसाहेब मोरे,सृष्टी रमेश पारडे, यांनी सिल्वर मेडल पटकावले तर सिद्धेश्वर खंडू विभुते,अमृता किशोर जाधव, संजीवनी चंद्रकांत कांबळे,समृद्धी दत्ता कांबळे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्याचबरोबर उर्दू शाळेचे मुख्याध्यापक खतीब तसेच श्रीमती बावचकर मॅडम यांचाही चांगल्या कार्याबद्दल गावकऱ्यां च्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अजय काळे,उर्दुचे मुख्याध्यापक खतीब, शिक्षिका बावचकर, श्रीमती दहिभाते,फरहत बाजी यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनसंपर्क कुशल अधिकारी श्री.बाळासाहेब पोकळे यांचा असाही सन्मान

## पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठ व कर्तव्यदक्ष पोकळेंना पदोन्नती

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील मूळ रहिवासी व अहिल्यानगर पोलीस दलातील कर्तव्यदक्ष व जनसंपर्क कुशल अधिकारी श्री. बाळासाहेब पोकळे यांची सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदावर पदोन्नती झाली आहे. दीर्घकाळापासून पोलीस सेवेत प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या पोकळे यांनी विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत जनतेचा व वरिष्ठांचा विश्वास संपादन केला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेले बाळासाहेब पोकळे यांच्या या कामगिरीचं तालुक्यात कौतुक होत आहे.



श्री. बाळासाहेब पोकळे यांनी आपल्या सेवाकाळात गुन्हेगारी नियंत्रण, वाहतूक शिस्त तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संवेदनशील प्रकरणांमध्ये दाखविलेली तत्परता आणि अचूक निर्णयक्षमता यामुळे ते ओळखले जातात. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या सेवेसाठी ते रस्त्यावर उतरले होते. राज्य राखीव पोलीस दल, दौंड येथून सुरू झालेला प्रवास पुढे मुंबई पोलीस दल आणि आता अहिल्यानगर पोलीस दलापर्यंत उल्लेखनीय राहिला आहे.

नक्षलग्रस्त गडचिरोलीतील भामरागड भागातही पोकळे यांनी जबाबदारी चोख पार पाडली. राज्य राखीव पोलीस दलाच्या माध्यमातून सण - उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे काम त्यांनी केले. त्यानंतर मुंबई पोलीस दलात काही वर्ष सेवा दिल्यानंतर त्यांची बदली अहिल्यानगर येथे झाली. येथे आल्यानंतर त्यांनी बीडीडीएस च्या माध्यमातून कर्तव्य बजावले. सध्या ते अहिल्यानगर भरोसा सेल येथे कार्यरत आहेत.

त्यांच्या या कामगिरीचा गौरव करून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांची सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती केली. या पदोन्नतीबाबत सहकारी अधिकारी, कर्मचारी, मित्रपरिवार तसेच स्थानिक नागरिकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव या गुणांमुळेच पोकळे यांना ही पदोन्नती मिळाली आहे. आगामी काळातही नागरिकांसाठी त्यांच्याकडून उत्तम सेवाच

# वडवणी ते साळींबा दोन महिन्यापूर्वी केलेल्या रस्त्यावर पडले खड्डे

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी अहिल्याबाई होळकर चौक ते साळींबा या सहा किलोमीटरचे रस्त्याचे काम गेले एक ते दोन महिन्यांपूर्वी संबंधित एजन्सी गुत्तेदारांनी केलेले असून सदरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत तसेच काही ठिकाणी रस्ता खचला आहे त्यामुळे या रस्त्याची लवकरच दुरावस्था होण्याची शक्यता आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित गुत्तेदार एजन्सीने रस्ता दुरुस्ती करावी अशी मागणी जनतेतून होत आहे .

वडवणी ते कवडगाव हा अर्ध्या तालुक्याला जोडणारा प्रमुख राज्यमार्ग असून यामध्ये या रोडवर मामला, साळींबा, पिंपरखेड,मोरेवाडी, कवडगाव यासह असंख्य गावचा दळणवळणाचा प्रमुख रस्ता आहे तरी यामध्ये रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ जनतेला



मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागतो यामध्ये लोकप्रतिनिधी दखल घेतल्यानंतर संबंधित रस्त्यासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून व पण टेंडरद्वारे संबंधित एजन्सी गुत्तेदाराला काम करण्याची मंजुरी दिली जाते तरी यामध्ये वडवणी येथील अहिल्याबाई होळकर चौक ते साळिंबा या सहा किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या एक-दोन महिन्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत संबंधित एजन्सीने केलेले असून यासाठी करोडो रुपये निधी खर्च करण्यात आलेला आहे संबंधित रोडच्या हॉट मिक्स काम केल्यानंतर याची काहि वर्ष दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही संबंधित एजन्सी गुत्तेदाराकडे असते तरी यामध्ये कामाच्या दोन महिन्यातच ऐण पावसाळ्यामध्ये साळिंबा या रोडची दुरावस्था झालेली असून यामध्ये साळिंबा फाटा तसेच साळिबा पुलाच्या अलीकडे यासह इतर ठिकठिकाणी डांबर उखडून मोठ मोठाले खड्डे पडलेले आहेत तसेच अनेक ठिकाणी डांबरासहित रस्ता खचलेला आहे तरी यामुळे इतक्या लवकर केलेले कामाची दुरावस्था झाल्याचे पहावयास मिळत असून त्यामुळे सदरील काम हे नियमानुसार झाले आहे का यामध्ये डांबर व इतर साहित्याचा वापर नियमाप्रमाणे करण्यात आलेला आहे का असे प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे तरी याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ लक्ष देऊन सदरील रोडची दुरुस्ती न केल्यास रोडची दुरावस्था होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी या भागाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी त्याकडे लक्ष देऊन संबंधित सार्वजनिक बांधकाम व गुत्तेदारांना समज देऊन रोड दुरुस्ती करण्याचे आदेश देण्याची मागणी जनतेतुन होत आहे.तसेच ग्रामस्थांकडून जनता व्यक्त केला जात आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने याविषयी तात्काळ लक्ष देऊन दुरुस्ती न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा साळिंबा यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

# कुंबेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ ; व्यापक जनजागृती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

तालुक्यातील कुंबेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. तसेच व्यापक जनजागृतीचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम, त्यामागील गुन्हेगारी साखळी, कायदेशीर शिक्षा आणि सुरक्षित पर्यायांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे एपीआय श्री.जगताप यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधत, 'अंमली पदार्थांचे व्यसन केवळ वैयक्तिक आयुष्यच उद्ध्वस्त करीत नाही, तर कुटुंब, समाज आणि भविष्यासाठ मोठा धोका ठरते असा इशारा ही त्यांनी दिला. व्यसनांमुळे होणारे सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक नुकसान प्रभावीपणे मांडले जात आहेत. हे जनजागृती अभियान केवळ



विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण ग्रामीण भागात पोहोचावे, अंमली पदार्थांविरोधात कठोर मानसिकता तयार व्हावी, हा यामागचा उद्देश असल्याचे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले. पोलिसांच्या या अभियानाचे नागरीकांतून स्वागत होत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण भागात 'नशामुक्त बीड जिल्हा - आपला संकल्प, आपलं भविष्य आपल्या हाती !' हे अभियान बीड जिल्हा पोलिस प्रमुख नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक मुरलीधर खोकले यांच्या पुढाकाराने प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. 'व्यसन नष्ट करणे म्हणजे केवळ स्वतःचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे रक्षण करणे.', अंमली पदार्थ आणि नशा आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि समाजाच्या प्रगतीसाठी घातक आहेत., व्यसनांमुळे स्वप्नं विझतात, नाती तुटतात, आणि आयुष्य अंधारात जातं., तरूणांना आणि मुलांना नशेच्या सापळ्यात अडकू देऊ नका., आपलं गांव, नशामुक्त गांव. चला, एकत्र येऊन हे शक्य करू हा विधायक संदेश घेऊन अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाणे काम करीत आहे. चला, नशेच्या अंधारावर प्रकाश टाकूया नशामुक्त, निरोगी आणि प्रेरणादायी बीड जिल्हा घडवूया..! असा संकल्प बीड जिल्ह्यातील पोलिस प्रशासनाने घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अंमली पदार्थांविरोधात पोलिसांकडून अभियान राबविण्यात आले. त्यानुसार विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. तसेच 'पोक्सो' या कायद्याची माहिती देण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती हजारे यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे एपीआय श्री.जगताप, एएसआय राजेंद्र ननावरे व पोलीस जमादार प्रवीण उळे यांचे स्वागत केले. यावेळी शाळेतील वरिष्ठ शिक्षक निळकंठ जिरगे, श्रीमती मिना अंबुरे, संतोष गायकवाड, महादेव गायकवाड आदींसह इतरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निळकंठ जिरगे यांनी केले. प्रास्ताविक संतोष गायकवाड यांनी केले. तर उपस्थितांचे आभार महादेव गायकवाड यांनी मानले.

# शालेय स्तरावर घुमू लागले निवडणुकीचे वारे,बहुजन कल्याण विभागाच्या सानेगुरुजी शाळेचा स्तुत्य उपक्रम



केज/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना लोकशाही समजावी मतदानाच्या हक्काबद्दल जनजागृती व्हावी आणि निवडणूक प्रक्रिया समजण्यासाठी गोपनीय पद्धतीने मत पत्रिकेद्वारे मुलांनी मतदानाचा हक्क बजावला.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवलेल्या आणि सतत उपक्रम शील शाळा म्हणून संपूर्ण राज्यात बहुजन कल्याण विभागा मध्ये गणल्या गेलेल्या साने गुरुजी निवासी विद्यालयात मुलांनी लोकशाहीचे धडे गिरवले आहेत.दि.१७ आगष्ट रोजी रविवारी साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्या डॉ.कविताताई गित्ते यांच्या मार्गदर्शनात आणि संकल्पनेतून विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक अतिशय उत्साहात पार पडली. दोन दिवसांपूर्वी निवडणुकीची अधिसूचना ज्ञानेश्वर पवार यांनी जाहीर केली.त्याप्रमाणे सर्व इच्छुक उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले.प्राप्त अर्जांची छाननी करून चिन्हांचे वाटप करण्यात आले निवडणूक मतपत्रिका जाहीर करण्यात आली. उत्साहात प्रचाराला सुरुवात केली.प्रत्यक्षात रविवारी मतदानाला सुरुवात झाली.या मतदान प्रक्रियेसाठी मतदान केंद्रावर रांगा लावून शिस्तबद्ध पद्धतीने मतदान केले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये निवडणूकीचा उत्साह दिसून आला.

# संवादातील गोडवा वाढवण्यासाठी चहा महत्त्वाचा - आ.डॉ.गुट्टे

गंगाखेड (प्रतिनिधी)

देशभरात चहा हे सर्वांच्याच आवडीचे पेय आहे. अनेकदा त्याचा संबंध थेट संस्कृतीशी जोडला जातो. सकाळची ताजगी, कामाच्या मधल्या वेळेतली ऊबदार विश्रांती किंवा मित्र-परिवाराच्या गप्पांची रंगत असो या सगळ्या प्रसंगांना चहाचा सुगंध खास बनवतो. परिणामी, जायका चहा स्टॉलच्या शुभारंभामुळे या चवीच्या आणि मैत्रीच्या प्रवासाला एक नवा टप्पा मिळाला आहे. सुगंधी मसाले, दर्जेदार चहा-पत्ती आणि प्रेमाने बनवलेला प्रत्येक घोट, शहरातील ग्राहकांना आनंद देईल. कारण, कौटुंबिक आणि सामाजिक संवादातील गोडवा वाढवण्यासाठी चहा हे पेय अतिशय महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात नव्याने सुरू होत असलेल्या जायका चहा स्टॉलचा शुभारंभ आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी जायका चहा हा व्यवसाय सुरू केल्याबद्दल कराळे परिवारास शुभेच्छा दिल्या. शिवाय, पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे औचित्य साधून कराळे कुटुंबीयांनी आ.डॉ.गुट्टे यांचे स्वागत करून आभार मानले.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, व्यवसायाच्या दृष्टीने चहा उद्योग हा कमी गुंतवणुकीत जास्त नफा मिळवून देणारा आणि दीर्घकाळ टिकणारा व्यवसाय आहे. भारतातील जवळजवळ प्रत्येक शहर-गावात चहा हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असल्याने, अशा व्यवसायाला नेहमीच चांगला प्रतिसाद मिळतो. जायका चहा स्टॉलमुळे सर्व ग्राहकांना स्वच्छ व गुणवत्तापूर्ण चहा मिळेल. त्यामुळे हा स्टॉल केवळ चहाचा स्वादच नाही, तर संवादाचे केंद्र ठरेल.

चहा हा भारतीय समाजाचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक घरात दिवसाची सुरुवात चहाने होते. तसेच कामाच्या दरम्यान, पाहुण्यांच्या स्वागतासाठी किंवा थोडा विरंगुळा हवा असेल तरी चहा सर्वांची पहिली पसंती असते. त्यामुळे चहाची मागणी वर्षभर कायम असते. शहरांपासून ते गावांपर्यंत, रेल्वे स्टेशनपासून ते ऑफिस परिसरापर्यंत, चहाची गरज कुठेही आणि कधीही निर्माण होऊ शकते. ही वाढती मागणी चहा व्यवसायासाठी मोठी संधी आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले.



# देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात

देगलूर : देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देगलूर येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहणाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. आमदार जितेश अतापुरकर व उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सामूहिक राष्ट्रगीत सादर करण्यात आले तर डॉ. सुनील जाधव यांनी राज्यगीत गायन केले. ध्वजाला पोलीस प्रशासनाकडून सलामी देण्यात आली.

कार्यक्रमास पोलीस उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी, तहसीलदार भरत सुरयवशी, गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, मुख्य कार्यकारी अधिकारी निलम काबळे, पोलीस निरीक्षक मारोती मुढे, नायब तहसीलदार गिरीश सरकलवाड, शिक्षणाधिकारी तोटावार आदी अधिकारी उपस्थित होते. तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, महिला, पुरुष व मोठ्या संख्येने देशप्रेमी नागरिकांनी हजेरी लावली.



एमपीएससीद्वारे जिल्हा समाज कल्याण अधिकारी म्हणुन निवड झाल्याबद्दल श्री. मयुर गौंड यांचा श्री. राजेंद्र धोंडे, ड. श्री. हनुमंत थोरवे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. श्री. हरिदास विधाते, श्री. पांडुरंग गावडे, नायब तहसिलदार पाटील, श्री. उत्तम बोडखे, प्रा. डॉ. अशोक माळशिखरे उपस्थित होते.

# आष्टीत प्रसिद्ध विधीज्ञ बाळासाहेब मोरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा व विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी न्यायालयातील प्रसिद्ध विधीज्ञ तथा युवा कार्यकर्ते अँड. बाळासाहेब मोरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा आज सोमवार दि.१८ ऑगस्ट रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात होणार आहे तसेच विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजाभिमुखतेने अँड. मोरे यांचा वाढदिवस साजरा होणार असल्याची माहिती अँड. बाळासाहेब मोरे मित्र मंडळाच्या वतीने दिली आहे.

लोकनेते आ. सुरेश धस यांचे कॉलेज जीवनापासूनचे एकनिष्ठ कार्यकर्ते, आष्टी न्यायालयात प्रसिद्ध विधिज्ञ तथा युवा कार्यकर्ते बाळासाहेब मोरे यांचा व त्यांची कन्या वृंदा हीचा देखील योगायोगने एकाच दिवशी वाढदिवस असल्याने अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात तसेच सामाजिक उपक्रमाद्वारे साजरा होणार आहे. वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप, रुग्णांना फळे वाटप, वृक्षारोपण व आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालयात रात्री ७ वा. अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे.

मित्र परिवारांचा मोठा गोतावळा नेहमी सुखदुःखात व अडचणीच्या काळात हाक दिली की धावून जात मदतीचा हात देणारं मित्रत्व जपणार व्यक्तिमत्व म्हणून त्याची एक वेगळी ओळख आहे.

सामाजिक, राजकीय, धार्मिक तसेच न्यायालयीन उपक्रमात नेहमी हिरारीने सहभाग त्यांचा पाहायला मिळतो. सामाजिक व समाजाच्या हिताचे प्रश्न आपल्या वकिली क्षेत्रातून मार्गी लावण्यात त्यांचा वेगळाच हातकंठा आहे. आपल्या व्यवसायातून गोरगरिबांचे अनेक प्रश्न मार्गी लावत मदतीची भावना सदैव डोळ्यासमोर ठेऊन ते आपल्या क्षेत्रात काम करत आहेत. मोठा मित्रपरिवार, समाजाप्रती आदर आणि नेहमी समाजाची सेवा करणे हाच एक उद्देश ठेवून आपल्या कार्यक्षेत्रात अतिशय प्रामाणिकपणे काम करणारे हे



व्यक्तिमत्व आहे. अँड. बाळासाहेब मोरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा होणारा असून या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अँड. बाळासाहेब भैय्या मोरे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोविंदा आला रे या जयघोषात गोविंदा पथकाने फोडली दहीहंडी...!

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

गोविंदा आला रे या जयघोषात जय मल्हार गणेश मंडळाच्या गोविंदा पथकाने फोडल्या दहीहंडी फोडली शहरातील श्री.शंकर महाराज वंजारी वस्तीगृह येथे राजकुमार (बाळा) गायके मित्र परिवारांच्या वतीने भव्य एकता दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, गेल्या दहा वर्षापासून अंबाजोगाई शहरात बाळा गायके मित्र परिवारांच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येते. दहीहंडी फोडण्यासाठी शहरातील गणेशोत्सव मंडळाच्या गोविंद पथकाने मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला होता, गोविंदा आला रे या जयघोषात गाण्याच्या तालावर युवकांनी चार ते पाच थराचे मानवी मनोरे लावत दहीहंडी फोडली,

या कार्यक्रमाची सुरुवात युवानेते अक्षय मुंदडा, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, पोलीस उपअधीक्षक ऋषिकेश शिंदे, शहर पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, मा.भाजपा जिल्हाध्यक्ष नीलकंठ चाटे, हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.अमोल दहिफळे व दै.बीड सुपरफास्टचे संपादक अतुल जाधव यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर, मा.नगराध्यक्ष महादू मस्के, जेष्ठनेते हिंदूलाल काकडे, भाजपा तालुकाध्यक्ष शिरीष मुकडे, शहराध्यक्ष संजय गंभीरे, डॉ.निशिकांत पाचेगावकर यांची उपस्थिती होती, कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजकुमार बाळा गायके यांनी केले तर उपस्थितांचे आभार किरण भालेकर यांनी मानले आहेत, दहीहंडी उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी बाळा गायके मित्र परिवार यांनी प्रयत्न केले. दहीहंडी पाहण्यासाठी शहरातील युवकांची महिलासह, बालगोपाळांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



दहीहंडी कार्यक्रमास कलावंतांची उपस्थिती

महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक राजन सरवदे, गायक तुकाराम सुवर्णकार, लावणी कलाकार श्वेता औवसौरमोल, सुप्रिया पुणेकर, स्थानिक कलाकार गीता उकरे, वैष्णवी राठोड आदी कलावंतांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली.

# विश्व हिंदू परिषदेच्या वतीने प्रफुल्ल कुलकर्णी यांना धर्मवीर जिवन गौरव पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

विश्व हिंदू परिषद अंबाजोगाई प्रखंड च्या वतिने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा, डॉ.शरदराव हेबाळकर, साईनाथ उपरे, डॉ.गोपाळ चौसाळकर,प्रणव रायचुरकर, गणेश पांचाळ, चंद्रकांत घोलप, कृष्णा देशमुख उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.प्रास्ताविक डॉ चौसाळकर, चंद्रकांतजी घोलप म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या माध्यमातून हिंदू समाज संघटनाचे कार्य सुरू आहे.हिन्दु समाजासमोर अनेक समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कृष्णा देशमुख म्हणाले की, प्रफुल्ल कुलकर्णी यांनी राष्ट्र कार्यासाठी जिवन झोकून दिले.देशापुढील समस्या सोडविण्यासाठी हिंदू तरुणांनी संघटीत होऊन कार्य केले पाहिजे.समाज देश व संस्कृती टिकली पाहिजे असे आवाहन केले.याप्रसंगी प्रमुख अतिथी



म्हणून बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की,समाज कार्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे.साधु संतांनी समाज जोडण्याचे काम केले.प्रफुल्ल नानांनी प्रतिकूल परिस्थितीत हिंदू समाज जोडण्याचे कार्य केले, कार्यकर्ते जोडण्याचे काम केले.हा सत्कार नानांच्या लढवय्ये पणाला आहे.या कार्यासाठी कै.वहिनींची खंबीरपणे साथ होती.पालकांनी आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करावेत तरच समाज एकसंघ निर्माण होईल.

प्रफुल्ल कुलकर्णी म्हणाले की,हिंदू समाज जागृती चे काम केले तो खारीचा वाटा आहे.सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे ज्या मार्गाने विजय मिळवता येतो तो मार्ग अवलंबला पाहिजे मला हिन्दू समाजाची साथ मिळाली म्हणूनच कार्य करु शकलो.आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपला पाहिजे.पण आमचा शत्रूबोध संपल्यामुळे हिंदू समाज संघटीत होण्यास अडचण होत आहे.समाजात काम करतांना समाज हित जोपासले गेले पाहिजे असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ.हेबाळकर म्हणाले की, मला कार्यकर्त्यांचे कौतुक करण्याची संधी मिळाली व्यापक मंथन झाले.देशात हिंदूंचे एक मोठे जनसंघटन व कार्यकर्ते उभे राहिले पाहिजे. तरच समाज उभा राहिल.हे कार्य संघाने उभे केले.अशा कार्यकर्त्यां पैकी एक प्रफुल्ल कुलकर्णी होत.हिन्दू एकजुट च्या माध्यमातून अनेक तरुण जोडले त्याचेच रूपांतर नंतर बजरंग दलात झाले.मी समाजासाठी काय करू शकतो याचा विचार केला पाहिजे.असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.आरती सोनेसांगवीकर,तर आभार प्रदर्शन जयदीप चिलमे यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन ड कल्याणीताई विर्धे यांनी केले.याप्रसंगी सर्व हिन्दूत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी साईनाथ उपरे यांच्या वतीने गौशाळे साठी मोफत औषधी वाटप करण्यात आली.

# राजकीय हक्कासाठी रिपाइंचा संकल्प मेळावा – दीपक कांबळे

केज/प्रतिनिधी

उपेक्षित घटकांच्या राजकीय हक्कासाठी रिपाइं (ए) च्या वतीने केज येथे संकल्प मेळावा आयोजित केला असून या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी केले.केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशाने आणि युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे,मराठवाड्याचे नेते मजहर खान आणि जिल्हा सचिव राजू जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२५ ऑगस्ट रोजी केज येथे मुक्ताताई लॉन्स येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)चा संकल्प मेळावा आयोजित आहे त्या निमीत दि.१७ ऑगस्ट रोजी तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी माहिती देण्यासाठी केज येथील शासकीयविश्रामगृहावर पत्रकार परिषद आयोजित केली होती.

या वेळी मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे,जिल्हा सल्लागार उत्तम आप्पा मस्के,जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड,तालुका सरचिटणीस गौतम बचुटे,उपाध्यक्ष रमेश निशिगंध,उपाध्यक्ष विकास आरकडे, उपाध्यक्ष बाळासाहेब ओव्हाळ,आयटी सेलचे सुरज काळे,जेष्ठ नेते दिलीप बनसोडे,युवा रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष विकास मस्के,युवा रिपाइंचे निलेश ढोबळे,जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, ज्येष्ठनेते ईश्वर सोनवणे, ज्येष्ठनेते कपिल कागदे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे,जेष्ठ नेते अंबादास तुपारे,येवता सर्कल प्रमुख हरीश गायकवाड,युवक सरचिटणीस हरेंद्र तुपारे,युवक उपाध्यक्ष विनोद गायकवाड,युवा संघटक विनोद शिंदे, रोहित कांबळे,अविनाश गायकवाड,उत्कर्ष काळे संगम कांबळे,समाधान जाधव,अक्षय जाधव, दत्ता जाधव,अनंत



काळे,सुमित काळे, बाळासाहेब जानराव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने केज शहरात होणाऱ्या संकल्प मेळाव्या निमित्त शासकीय विश्रामगृह केज आयोजित नियोजन बैठकीस मार्गदर्शन करताना तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यावेळी मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे,जिल्हा सल्लागार उत्तम अप्पा मस्के,जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे,जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड, युवा जिल्हा कार्याध्यक्ष विकास मस्के,जेष्ठ नेते कपिलजी कागदे,जेष्ठ नेते दिलिप बनसोडे, जेष्ठनेते ईश्वर भाऊ सोनवणे,तालुका सर चिटणीस गौतम बचुटे, आयटी सेल तालुका अध्यक्ष सुरज काळे,

तालुका उपाध्यक्ष रमेश निशिगंध,तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे, जेष्ठ नेते अंबादास तुपारे,येवता सर्कल प्रमुख हरीश गायकवाड,युवक सरचिटणीस हरेंद्रतुपारे, युवक उपाध्यक्ष विनोद गायकवाड,युवा संघटक विनोद शिंदे,रोहित कांबळे,अविनाश गायकवाड,उत्कर्ष काळे,संगम कांबळे, समाधान जाधव,अक्षय जाधव,दत्ता जाधव, अनंत काळे,सुमित काळे,बाळासाहेब जानराव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी संवाद साधताना दीपक कांबळे म्हणाले की, स्वातंत्र्य मिळून देशाला ८९ वर्ष झाली तरी उपेक्षित आणि वंचित घटकांना खऱ्या अर्थाने राजकीय न्याय मिळत नाही.आरक्षण हे केवळ नावालाच असून आरक्षणाच्या आडून त्याचा गैरवापर होत आहे.त्यासाठी संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे. आता आम्ही उपेक्षित घटकांच्या हक्कासाठी संघर्ष करणार असून देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले आणि पप्पू कागदे यांच्या नेतृत्वा खाली लढा उभारण्याचे त्यांनी संकेत दिले. शेवटी त्यांनी मेळावा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे आणि जास्तीत जास्त संख्येने आपल्या न्याय व संवैधानिक मागण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.



केज/ प्रतिनिधी

आनंदगांव ता.केज जि. बीड येथे २० व्याशतका तील महान विभुती ह.भ.प.कै.आश्रुबा दादा गायकवाड यांनी गोकुळ अष्टमी कृष्ण जन्माष्टमी निमित्त सुरु केलेली ग्रंथ वाचन,भजन व गोपाळ काला गावजेवण परंपरा या वर्षीही त्यांच्या मुलांनी पुढे चालवली.शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री गोकुळ आष्टमीनिमित्त श्रीकृष्ण जन्माच्या ग्रंथाचे वाचन, भाविकांनी रात्री जागर व दि.१६ऑगस्ट २०२५ रोजी सर्व लहान मोठ्या सर्वांसाठी जात,धर्म, पंथाच्या पलिकडेजावून सर्वांसाठी गोपाळकाला केला.ह.भ.प.कै. आश्रुबादादा गायकवाड यांची चारमुले रामकृष्ण तात्या गायकवाड, नवनाथ बापू गायकवाड डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड,ज्ञानोबा काका गायकवाड यांनी एकत्रीत ही परंपरा कायम चालु ठेवली आहे.गं.भा.भागिरथी अक्का गायकवाड मुली,सुना,नातू,पणतू व महिला,पुरुष भजनी मंडळ,लहान,मोठे, ग्रामस्थ यांनी या गोपाळ काल्यात सहभागघेतला व एकत्र महाप्रसादाचा लाभ घेतला.

# स्वराज्य पॅनेलचे युवा नेतृत्व निलेश उपाध्ये यांना बँकेच्या सेवेची संधी द्या – चौरे

मुंबई (प्रतिनिधी) दि म्युनिसिपल को ऑप बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत संचालक पदासाठी सामाजिक कार्यकर्ते निलेश राजमल उपाध्ये हे स्वराज्य पॅनल कडून उभे आहेत. निलेश राजमल उपाध्ये यांनी आजपर्यंत कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांचे कामे मोठ्या प्रमाणात केली आहेत अजूनही करत आहेत. आपले काम सांभाळून ओळखीच्या किंवा फोनद्वारे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांवर विविध प्रकारचे उपचार घेण्यासाठी रुग्णालयाच्या विविध



विभागातून उपाध्ये यांनी कायम मदतीचा हात दिला आहे. त्याच बरोबर इतर विभागात देखील त्यांचे सौजन्यपूर्वक संबंध असल्याने त्यांचा विजय निश्चित आहे. त्यामुळे युवा नेतृत्वाला दि म्युनिसिपल को-ओपरेटिव्ह ऑफ बँकेचे संचालक पदासाठी सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सचिन चौरे यांनी केले आहे.

यावेळी वैभव नाईक, सुधीर खांडेकर, विश्वास पाटील, अजित वाघ, संतोष घुगे, अजिंक्य पवार, सुरेश काळे, गजानन वाघमोडे, शिवकुमार जिंदमवर, अविनाश देशमुख, विजय निकम उपस्थित होते.




# श्रीचंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

देगलूर : वारकरी संप्रदायातील थोर संतपुरुष, आध्यात्मिक क्षेत्रातील गाढे अभ्यासक सद्गुरु श्रीचंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या शिष्य परिवाराकडून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.देगलूर येथील श्री धुंडामहाराज मठ संस्थान येथे दि. १७ ऑगस्ट रोजी झालेल्या या शिबिरात महाराष्ट्र, तेलंगाणा आणि कर्नाटक या तिन्ही राज्यातील शिष्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. सद्गुरु श्रीचंद्रशेखर महाराज देगलूरकर सेवा मंडळातर्फे झालेल्या या उपक्रमात तब्बल ११० पेक्षा अधिक जणांनी रक्तदान केले. हा कार्यक्रम गोळवलकर गुरुजी रक्तकेंद्र, नांदेड यांच्या सहकार्याने पार पडला.

विशेष म्हणजे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील व माजी नगरसेविका सौ. अनघा पाटील, माजी नगरसेवक दिंगबर कडलवार, हाणमंत कडलवार यांनी श्रावण उपवास पाळत असूनही रक्तदान करून समाजाप्रती कर्तव्य पार पाडले.

या वेळी ऋतुपर्ण चंद्रशेखर महाराज, माजी नगराध्यक्ष मोगलानी शिरशेटवार, तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे, हभप दत्तात्रय जानते, हभप दामोदर देशाईकेरूरकर, कृष्णा जोशी नळगीरकर, श्रीनिवास देशमुख, श्रीनिवास कुलकर्णी, शिवाजी पाटील शिंदे, संतोष कांबळे, रमाकांत जोशी, विनायक पोतदार, संतोष देगलूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी मिरवणूक संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशतोकोतर सुवर्ण महोत्सवी ७२५ व्या जयंती निमित्त माऊलींची पालखी मिरवणूक आणि वारकरी सांप्रदायिक दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रा आणि दिंडीमुळे आष्टी शहर भक्तिमय झाल्याचे दिसून येत होते. या शोभायात्रेत आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस व नगरपंचायत चे मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे यांनी सहभाग झाले होते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७२५ व्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त राज्यभरातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां, नगरपंचायत, नगरपरिषद या ठिकाणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीची मिरवणूक आणि वारकरी संप्रदायाच्या जयघोषात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये भाविकांच्या उत्साहात आणि भक्तिभावाने माऊलींचा भव्य पालखी सोहळा आयोजित



करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत टाळकरी, वारकरी संप्रदायातील मंडळी तसेच नागरिक बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानोबा माऊली आणि माऊली माऊली च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला. यावेळी हरिभक्त परायण अशोक भोसले महाराज यांच्या श्री संत नामदेव महाराज गुरुकुल पारगाव जोगेश्वरी येथील ३५ विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवला. आष्टी शहरातील श्री दत्त मंदिर येथून या पालखी सोहळ्यातील सुरुवात करण्यात आली आणि ही शोभायात्रा दत्त मंदिर गल्ली कसबा पेठ कुंभार गल्ली जैन मंदिर कमान वेस मार्गे मुख्य बाजारपेठ शनी मंदिर चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये या शोभा यात्रेची सांगता झाली.

या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन माऊलींचे दर्शन घेत अनेक भाविक भक्तांनी आत्मिक आनंदाचा अनुभव घेतल्याचे पहायला मिळाले असे प्रतिपादन आ. सुरेश धस यावेळी वारकऱ्यांशी संवाद साधताना केले. या शोभायात्रेत आष्टी नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



रेणुकाई कंन्ट्रक्शन कंपनीचे संचालक इंजि. श्री. प्रविण वारे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करतांना मा. सभापती श्री. बद्रीनाथ जगताप, जेष्ठ पत्रकार श्री. उत्तम बोडखे, मा. पं. स. सदस्य श्री. यशवंत खंडागळे, श्री. राजेंद्र लाड सर दिसत आहेत.



# स्वातंत्र्यरक्षणाबरोबरच पर्यावरण संवर्धन काळाची गरज – आदित्य पाटील

केज (प्रतिनिधी)

भारताच्या उज्ज्वल आणि समृद्ध भविष्या साठी स्वातंत्र्याचे रक्षण व पर्यावरणाचे संवर्धन करणे काळाची गरज व भविष्याची मागणी असण्याचे प्रतिपादन माऊली विद्यापीठ केजचे सचिव आदित्य पाटील यांनी केले.ते ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त माऊली विद्यापीठ संकुलात सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झेंडावंदन कार्यक्रमात तेअध्यक्षीय स्थानावरून बोलत होते

यावेळी सचिव आदित्य पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी श्रीमती तेजस्विनी अशोक पाटील,सौ.देविका आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री.प्रताप मोरे,प्राचार्य डॉ.गौतम पाटील, प्राचार्य विजयकुमार शिनगारे,प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पर्यावरण संरक्षण व हरितक्रांतीसाठी महत्वपूर्ण पाऊल उचलत यावेळी मान्यवरांच्या हस्ते संकुल परिसरात ५०० झाडांच्या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.तसेच येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प स्वातंत्र्य दिनी घेण्यात आला.

# लोकमान्य टिळक विद्यालयाच्या बालविवाह प्रतिबंध नाटिकेने ग्रामस्थांचे लक्ष वेधले

दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयातील विद्यार्थिनींनी पोखरी ग्रामपंचायत कार्यालयासमोर सादर केलेल्या बालविवाह प्रतिबंध नाटिकेने सर्व ग्रामस्थांचे लक्ष वेधले.शासनाच्या सर्वेक्षणानुसार बीड जिल्ह्यात बालविवाहचे सर्वाधिक प्रमाण आढळून आले आहे.अनादिकाळापासून चालत आलेल्या या अनिष्ठ प्रथेला विविध माध्यमातून अनेकांनी रोखण्याचा प्रयत्न करून देखील हे प्रमाण कमी झाले नाही.याचे गांभीर्य लक्षात घेऊन लोकमान्य टिळक विद्यालयाने गावातील सर्व ग्रामस्थांसामोर बालविवाह प्रतिबंध नाटिकेतून जनजागृती केली.



सहशिक्षिका श्रीम.पल्लवीताई कुलकर्णी यांनी दिग्दर्शित केलेल्या या नाटिकेतुन प्रिया बळवंत,नेहा वाघमारे,विद्या निकम,अक्षरा नेवल,पायल वाघमारे,अस्मिता निकम,दुर्गा निकम,प्रगती निकम,देविका निकम,अल्फिया शेख,गायत्री होळकर,मिसबा शेख,शिफा शेख,नंदिनी शिंदे यांनी समर्पक अभिनय करत उत्कृष्टपणे हा संवेदनशील विषय सर्वांपर्यंत पोहचविला.सर्व ग्रामस्थांनी नाटिकेला भरभरून प्रतिसाद दिला.सामाजिक संदेश देणाऱ्या या नाटिकेतील सर्व मुलींचे सरपंच श्रीहरी होळकर यांनी ५०० रोख रक्कम भेट देऊन कौतुक केले.

हर घर तिरंगा अभियान आणि ७९ व्या स्वतंत्र्य दिना निमित्त विद्यालयात सकाळी ठीक ७:२०वा मुख्याध्यापक श्री.अरुणराव पत्की यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी राष्ट्रगीत,राज्यगीत आणि संपूर्ण वंदे मातरम घेण्यात आले.सहशिक्षक श्री.नितीन चौधरी यांनी सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण वंदे मातरम चा सविस्तर अर्थ सांगितला.

याप्रसंगी शालेय समिती अध्यक्ष श्री.आप्पाराव यादव,पालक श्री.विश्वनाथअप्पा निकम, श्री.आत्माराम नांदूरकर, श्री.भास्करराव निकम आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते भारत माता,राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विद्यालयाच्या वतीने उपस्थितांचा यथोचित सन्मान करण्यात आला.'स्वातंत्र्य दिन चिरायू होवो' असा जयघोष करत सर्व विद्यार्थ्यांची गावातून तिरंगा रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन श्री.नितीन चौधरी यांनी केले. कार्यक्रमात सर्व विद्यार्थी,पालक,माजी विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे सरांचे वडवणीत व्याख्यान संपन्न

## विद्यार्थी व पालकांची व्याख्यानास तुफान गर्दी

वडवणी (प्रतिनिधी)

देवदूत प्रतिष्ठान वडवणी च्या वतीने डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समिती यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १६/०८/२०२५ शनिवार रोजी सकाळी ११:०० वाजता राम मंदिर चौक वडवणी येथे, महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध व्याख्याते तथा प्रबोधनकार डॉ.वसंत हंकारे सर यांचा चला जगूया आनंदाने सुखी जीवनाचा मुलं मंत्र शिकवणारे ,न समजलेले आई बाप विषयावर व्याख्यान संपन्न झाले.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ.ओमप्रकाशजी शेटे साहेब आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समितीचे अध्यक्ष व त्यांच्या अर्धांगिनी सौ.शिल्पाताई शेटे,कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके ,मा.आ.केशवराव आंधळे,युवा नेते भारतजी जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, गटशिक्षण अधिकारी बी.वाय.उजगरे,काँग्रेस पार्टीचे नेते दादासाहेब मुंडे,शिवसेना नेते श्री.विनायक बप्पा मुळे,आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त श्री.राज पाटील,वडवणी कृ.उ.बा.स. उपसभापती अनिलदादा चोले,श्री.बंडूजी खांडेकर देवदूत प्रतिष्ठान अध्यक्ष अदीमान्यवर म्हणून उपस्थित होते.


माजी आमदार केशवराव आंधळे यांनी डॉ.ओमप्रकाशजी शेटे यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून त्यांना शुभेच्छा दिल्या त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.ओमप्रकाशजी शेटे साहेब यांनी व्याख्यानाच्या कार्यक्रमाला आल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले व सर्व विद्यार्थिनींच कॅन्सर रोग प्रतिबंधात्मक व्हॅक्सिनेशन मोफत करणार अशी घोषणा त्यांनी केली.

देवदूत डॉ.ओमप्रकाशजी शेटे साहेब व त्यांच्या अर्धांगिनी सौ.शिल्पाताई शेटे मॅडम या दोघांचा सपत्नीक सत्कार करून केक कापून वाढदिवस साजरा केला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्यानकार डॉ.वसंत हंकारे सर यांच्या व्याख्यानाला प्रारंभ झाला चला जगूया आनंदाने सुखी जीवनाचा मूल मंत्र व न समजलेल्या आई-बाबा या विषयावर व्याख्यान दिले अनेक विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींना त्यांच्या आई-बाबांची किंमत कळाली.

# नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या – खा. रजनीताई पाटील

केज/प्रतिनिधी

चार दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर खा. रजनीताई पाटील यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे.



शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. पाऊस,नैसर्गिकआपत्ती मुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. नुकसानग्रस्त भागांचा तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल.त्यामुळे प्रशासनाने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणारअसल्याचे त्यांनी सांगितले.



परभणी, (प्रतिनिधी) : गेल्या काही दिवसांपासून झालेल्या जोरदार पावसामुळे पूर्णा तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आज पूर्णा तालुक्यातील लिमला, दगडवाडी, वझर, देवठाणा, देऊळगाव दुधाटे, धानोरा काळे, माहेर बानेगाव, फुलकळस आदी गावांना भेट दिली.

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन सोयाबीन, कापूस व इतर पिकांचे झालेले नुकसान पाहिले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.या पाहणी दरम्यान उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसीलदार माधव बोथीकर, मंडळ अधिकारी, तलाठी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील तसेच संबंधित शेतकरी उपस्थित होते. नुकसानीची तीव्रता लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक ती मदत त्वरीत उपलब्ध करून द्यावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

# विदेशी महागली, देशी रंगली

## भाववाढीने पार्टी कल्चरवर ब्रेक, देशी दुकानांत मात्र उसळली गर्दी

डॉ. आशिष तिवारी / मंठा -

राज्य सरकारच्या करवाढीमुळे विदेशी दारूचे भाव गगनाला भिडले असून, मंठा व परिसरातील अनेक 'दारू प्रेमी' आता देशीकडे वळले आहेत. ब्रँड निष्ठा सोडून 'देशप्रेमी' बनण्याची ही वेळ मद्यपींवर कधीच आली नव्हती.

पूर्वी विदेशी दारूच्या एका पार्टीसाठी चार-पाच मित्र एकत्र येऊन पैसा जमा करत, बाटली उघडत आणि रात्रीचा जल्लोष सुरू होत असे. मात्र आता महागाईच्या झटक्यामुळे ती बाटली परवडेनाशी झाली आहे. त्यात एकाच बाटलीवर सर्वांची नशा भागत नसल्याने मित्रांमध्ये 'कट' मारून थेट देशी दारूकडे धाव घेण्याचे प्रमाण वाढले आहे.

देशी हातभट्टी व गावठी दारूच्या दुकानासमोर सकाळपासूनच रांगा लागतात. दुसरीकडे बार, हॉटेल्स आणि परमिट रूमचे टेबल रिकामे पडले आहेत.

मोठ्या वाईन शॉपमध्ये एमआरपीनुसार दारू मिळत असल्याने लहान विक्रेत्यांचे नुकसान झाले आहे. शिवाय, हॉटेलमध्ये बाहेरून आणलेले मद्य पिण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे अनेक परमिट रूममधील ग्राहकसंख्या कमी झाली असून, काही व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

मद्यपींचा रूट बदलला




भाववाढीपूर्वी मित्रांचा घोळका जमून पार्टी रंगायची. आता मात्र प्रत्येकजण आपली बाटली गुपचूप घेऊन थेट घर गाठतो. गावोगावी आणि शहरात हाच नवा ट्रेंड पाहायला मिळते.

मद्यपींची सरकारवर टीका

करवाढीमुळे देशी-विदेशी दोन्ही प्रकारच्या दारूचे दर वाढले आहेत. सर्वसामान्य, कामगार वर्ग व हॉटेल व्यवसायिकांनी राज्य सरकारवर टीका करत, महागाईने आमच्या नशेचाही मूड मारला असे उपरोधिक भाष्य केले आहे.